अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे
साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २७.०२.२०२६ | अंक नं. २७४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

समता पतसंस्था
नो रिस्क, रिटर्न्स फिक्स
११००+ कोटींच्या ठेवी
ठेवींवर मिळवा १०% पर्यंतचे व्याज
लिक्विडिटी बेस प्रोटेक्शन स्कीम
अंतर्गत ठेवीदारांच्या ठेवी, पूर्णपणे सुरक्षित.
संपर्क : ७७२२ ०१० २२२
४० वर्षे ग्राहकांच्या विश्वासाची!

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना
चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹888/-
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*

SONI TILES Since 1965 AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

# महानगरपालिका सभागृहाची दुरुस्ती नाही; आयुक्तांच्या दालन सजावटीवर मात्र उधळपट्टी

## २३० कोटींच्या तोट्यात 'सजावटीचा धडाका', नगरसेवक पहिल्याच सभेत आक्रमक

नगर – महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या कार्यपद्धतीविरोधात नागरिकांमध्ये आधीच तीव्र असंतोष आहे. मात्र, आता या असंतोषाला विद्यमान नगरसेवकांचा थेट आक्रमक सूर मिळाल्याने महापालिकेच्या राजकारणात मोठा स्फोट झाला आहे. २६ फेब्रुवारी रोजी झालेल्या सभेत आयुक्तांच्या कारभाराविरोधात नगरसेवकांनी उघडपणे संताप व्यक्त करत, सभागृहाची दुरुस्ती नाही, पण आयुक्तांचे दालन मात्र ऐशारामात! असा घणाघाती हल्ला चढवला.

आयुक्तांनी स्वतःच्या दालनाच्या सजावटीसाठी मोठा खर्च केल्याचा मुद्दा समोर येताच सभागृहात संतापाची लाट उसळली. सभागृहाची दुरावस्था झालेली आहे. त्यातच आयुक्तांनी मात्र स्वतःच्या दालनावर भर दिलेला आहे. त्यामुळे नगरसेवकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. नगरसेवकांनी थेट सवाल केला की, पदाधिकारी येणार हे माहीत असताना सभागृहाची देखभाल–दुरुस्ती का केली नाही? आयुक्तांना पदाधिकारी येणार नाहीत असे वाटत होते का? म्हणूनच त्यांनी स्वतःचे दालन सुसज्ज करून घेतले का? या प्रश्नांनी सभागृहातील वातावरण तापले. महापालिका तोट्यात असताना आयुक्तांचे दालन अद्यावत करणे गरजेचे होते का, असा थेट जाब विचारण्यात येत आहे.

शहरातील विकासकामे, प्रशासकीय निर्णयप्रक्रिया, तसेच लोकप्रतिनिधींना डावलून थेट निर्णय घेण्याची आयुक्तांची पद्धत यामुळे नगरसेवकांमध्ये आधीच तीव्र नाराजी होती. २६ फेब्रुवारी रोजी झालेल्या सभेत या नाराजीचा अक्षरशः स्फोट झाला. प्रशासकराज काळात आयुक्तांनी घेतलेल्या सर्व निर्णयांची, करण्यात आलेल्या कामांची आणि झालेल्या खर्चाची सखोल चौकशी करण्याची ठाम मागणी होत आहे.

प्रशासकराज काळात नेमका निधी कुठे गेला? कोणत्या कामांवर किती खर्च झाला? त्या कामांची गुणवत्ता काय? असे सवाल उपस्थित करत कोट्यवधी रुपयांच्या खर्चात पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप करण्यात आला. स्वतंत्र चौकशी समिती नेमून सर्व व्यवहारांची तपासणी करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

दरम्यान, शहरातील नागरिकांमध्येही महापालिकेच्या कामकाजाबाबत प्रचंड असंतोष आहे. रस्त्यांची दुरवस्था, पाणीटंचाई, कचरा व्यवस्थापनाचा बोजवारा आणि अपुऱ्या आरोग्य सुविधांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेवर आर्थिक बोजा असतानाही आयुक्तांनी स्वतःच्या दालनावर खर्च केल्याचा प्रकार समोर येताच संतापाचा उद्रेक झाला आहे.

आयुक्तांप्रमाणेच महापौरांचेही दालन सुसज्ज करा, अशी मागणी होऊ लागली आहे. इतकेच नव्हे, तर जोपर्यंत महापौरांच्या दालनाचे नुतनीकरण होत नाही, तोपर्यंत आयुक्तांचे दालन महापौरांना द्यावे, अशी आक्रमक भूमिका घेतली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासन आता काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आयुक्तांनी तातडीने आपल्या कार्यशैलीत बदल करून पारदर्शक, संवेदनशील आणि लोकशाही मूल्यांनुसार कारभार केला नाही, तर महापालिकेत मोठा राजकीय व प्रशासकीय संघर्ष अटळ असल्याचे संकेत मिळत आहेत. २३० कोटींच्या तोट्यातील पालिका आणि 'ऐशारामी' दालन हा विरोधाभासच आयुक्तांच्या अडचणी वाढवणारा ठरत आहे.

Happy Birthday
दादा..
वाढदिवस आपला आमच्या मनात लिहीला आहे. प्रत्येक दिन आपणास शुभेच्छा देत आहोत...
आमचे मित्र
प्रितीश दादा छाजेड
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
हॅलो 9371525000 / 9822501100
शुभेच्छुक
हॅलो ग्रुप मित्र परिवार
पुणे, नाशिक, अहिल्यानगर

कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांना
जयंतीदिनानिमित्त विनम्र अभिवादन!
मराठी भाषा गौरव दिनाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!
मा.श्री. अविनाश देडगांवकर
शूरवीर जीवा महाले कार्य गौरव पुरस्कार प्राप्त
ज्येष्ठ समाजसेवक,अहिल्यानगर

बाळ आजारी आहे का?
ते वारंवार आजारी असणे ▪ नेहमी सर्दी, खोकला
▪ वारंवार होणारा बाल दमा ▪ वारंवार जुलाब होणे
▪ प्रतिकारशक्ती कमी असणे ▪ वजन, उंची कमी
या तक्रारींवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर
*सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
*सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
संपर्क : मो. ९५११११०४४४
डॉ.अनिरुद्ध गिते MBBS / MD paeds
अक्षय मुलांचे हॉस्पिटल बालिकाश्रम रोड, अ.नगर

४०० स्क्वे. फुट रोडटच हॉल भाड्याने देणे
पहिल्या मजल्यावरील तहसील कार्यालयजवळ टि.व्हि. सेंटर रोड येथे
7057953250

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरूमकरिता सेल्समर्ल्स पाहिजे.
आकर्षक पगार
भेटा : कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

महाराष्ट्र स्क्रॅप
एम.आय.डी.सी., अ.नगर
आमच्याकडे सर्व जुने डॅमेज खराब एसी, फ्रिज तसेच मोबाईल तसेच बॅटरी
योग्य किंमतीत विकत घेतो
8624976297
9561424225

पोरवाल ज्वेलर्स
सुवर्णविश्वात उज्ज्वल करिअरची संधी!
अनुभवी सेल्समन | सेल्सगर्ल
१० पदे | १० पदे

JOIN ONLY IN 4500/-
DiSHA Computer Institute
An ISO 9001 : 2015 Certified
Expert in Computer Training
MS-OFFICE TALLY PRIME ADV. EXCEL 3 Month
CORELDRAW PHOTOSHOP CANVA 3 Month
CAD 2D CAD 3D PHOTOSHOP 3 Month
C LANG C++ HTML 3 Month
ENROLL NOW...
Other Courses Also In 4500/-
Core Python | Adv Python | Core Java | Adv Java
SQL & PL SQL | Power BI With Excel | Digital marketing
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769

विशिष्ट प्रकारचे बेसिन शोधत आहात?
आता तुमचा शोध संपला!
आजच भेट द्या अभय सेल्सला...
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE

पुन्हा एकदा
महासेल...लूट लो ऑफर..
खास ग्राहकांच्या आग्रहास्तव महिला दिनानिमित्त महिलांसाठी महासेल..
गुरुवार दि. ०५ मार्च ते शनिवार दि.७ मार्च २०२६ पर्यंत..
* फक्त महिलांसाठी :-
ऑरगेन्झा स्कर्ट, भारीतले स्ग, कॉटन पॅण्ट,शर्ट,टी-शर्ट, दोन स्ट्रेचेबल ब्लाऊज.
यापैकी काहिही घ्या. फक्त ₹100/-
यापैकी काहिही घ्या. फक्त ₹200/-
टु पिस, वन पिस,नाईट ड्रेस,कॉड सेट, वर्क केलेले ब्लाऊज, फॉरमल पॅन्ट, ट्राऊजर, टॉप,कुर्ती,जीन्स, बिग साईज टी-शर्ट,स्कूल बॅग,फोल्डिंग बॅग.
चांगल्या क्वॉलिटीच्या साड्या फक्त ₹150/-
वेळ : दु.१२ ते सायं.७ पर्यंत.. मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर

# गृहिणी

## आरोग्य

### ...तर हे खाणे टाळा

मूत्रपिंड हे आपल्या शरीरातील एक अवयव आहे जे रक्त स्वच्छ करण्यासाठी २४ तास अथकपणे काम करते. ते शरीरातील विषारी पदार्थ, जास्त पाणी आणि निरुपयोगी खनिजे काढून टाकून आपल्याला आतून निरोगी ठेवण्यास मदत करतात. पालक आरोग्यासाठी खूप फायदेशीर असला तरी, असे म्हटले जाते की कोणत्याही गोष्टीचा अतिरेक चांगला नसतो. म्हणून, पालक नेहमी माफक प्रमाणात खावा. पालकमध्ये ऑक्सलेटचे प्रमाण जास्त असते, म्हणून तुम्ही ते माफक प्रमाणात सेवन करावे. वांगी देखील टाळावी.

## पाककला

### पालक पनीर समोसा

**साहित्य –** अर्धे गव्हाचे पीठ आणि मैदा, ३ टेबलस्पून तेल किंवा तूप, अर्धा टीस्पून ओवा, ५०० ग्रॅम पालक, चवीनुसार मीठ, पाणी, २५० ग्रॅम पनीर, १ कप बारीक चिरलेला ताजा पालक, १ टेबलस्पून तेल, १ टीस्पून जिरे, २ हिरव्या मिरच्या, बारीक चिरून, १ इंच आले, किसलेले, अर्धा टीस्पून हळद पावडर, १ टीस्पून लाल तिखट, १ टीस्पून गरम मसाला, अर्धा टीस्पून आमसूल पावडर

**कृती –** सर्वात आधी पालक पाण्याने धुवा जेणेकरून घाण निघून जाईल. नंतर ते उकळवा आणि पालक बारीक चिरून घ्या. आता एका मोठ्या भांड्यात पीठ, ओवा, मीठ आणि तेल एकत्र करा. मुठी बंद केल्यावर पीठाचा गोळा होईपर्यंत ते हाताने घासून घ्या. आता थोडे थोडे पाणी घाला आणि घट्ट पीठ मळून घ्या. ते ओल्या कापडाने झाकून ठेवा आणि ३० मिनिटे राहू द्या. आता समोसा स्टफिंग बनवण्यासाठी, पनीरचे लहान चौकोनी तुकडे करा. पालक देखील बारीक चिरून घ्यावा. यानंतर, पनीरमध्ये थोडे तेल घाला. त्यात जिरे घाला. यानंतर, सर्व मसाले मिसळा. नंतर, हे सर्व साहित्य घाला आणि स्टफिंग पूर्णपणे तयार करा. पिठाचे आता लहान गोळे तयार करा. ते लाटून घ्या. नंतर, अर्धचंद्राच्या आकारात कापून घ्या. नंतर, एका कडेला पाणी लावा आणि त्याला शंकूचा आकार द्या. तसेच पालक-पनीर फिलिंगने भरा आणि वरच्या कडा पाण्याने चिमटीत करून सील करा. पॅनमध्ये तेल गरम करा. तेल मध्यम गरम असल्याची खात्री करा. समोसे घाला आणि मंद आचेवर सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळा.

## वास्तू

### अशी असावी भिंत

* भिंतींची योग्य रचना, रंग आणि सजावट घरात सकारात्मक ऊर्जा, सुख आणि समृद्धी आणते. भिंती सरळ आणि एकसमान असाव्यात, पूर्व-उत्तर दिशा कमी उंचीची, तर दक्षिण-पश्चिम भिंती जाड आणि उंच असाव्यात फिकट रंगांचा वापर करा. आणि मुख्य दरवाजावर शंख ठेवणे शुभ.

* पूर्व आणि उत्तर दिशेच्या भिंती पश्चिम आणि दक्षिण दिशेच्या भिंतींपेक्षा कमी उंचीच्या असाव्यात

## सौंदर्य

टोमॅटोचा रस कधीही नुसता त्वचेला लावू नये कारण त्यातील ॲसिड त्वचेचा पीएच खराब करते. यासाठी त्यामध्ये मध घालूनच टोमॅटोचा रस चेहऱ्याला लावावा.

## सल्ला

पाण्यातून काढल्यानंतर वाटाणे व्यवस्थित सुकवणे महत्त्वाचे आहे. यासाठी वाटाणे एका सुती कापडावर पसरवून त्यातील सर्व पाणी पूर्णपणे सुकू द्या. वाटाणे कोरडे झाल्यावरच ते साठवा.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६

---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन शुक्लपक्ष, पुनर्वसु ०९|३५, सूर्योदय ०६ वा. ४० मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.

## राशिभविष्य

**मेष** : मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल.

**वृषभ** : आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात.

**मिथुन** : ठरविलेले काम पूर्ण करण्यासाठी काही प्रसंग प्रेरणादायी ठरतील. यथायोग्य विचार करून कार्य करा.

**कर्क** : निष्कारण प्रश्नांचा त्रास राहील. आरोग्याची काळजी घ्या.

**सिंह** : आजचा दिवस आपल्या कार्य-योजनेसाठी आणि सहकार्यांबरोबर आपल्या संबंधांसाठी विधायक ठरेल.

**कन्या** : अधिक चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी चांगली वेळ आहे. चांगले भोजन मिळेल.

**तूळ** : बेपवाई, बेशिस्त, योजनेच्या कार्यवाहीत खोळंबा निर्माण करू शकते.

**वृश्चिक** : सार्वजनिक जीवन बहुमूल्य राहील. आपणास एखाद्या योजनेसाठी इतरांचे सहकार्य हवे असेल.

**धनु** : हितचिंतकांकडून व्यापारासंबंधी चांगला सल्ला मिळू शकतो.

**मकर** : आपल्या आवश्यकतेप्रमाणे इतर लोक आपल्या मदतीला येतील. इतर योजना आणि उपक्रम नेहमीसारखेच चालू द्या.

**कुंभ** : आपणास गरज असेल तेव्हा कुटुंबियांचे सहकार्य मिळेल.

**मीन** : आपल्या आर्थिक मुद्द्यांनुसार एखाद्याचे मन वळविणे कठिण होईल. आरोग्याची काळजी घ्या.

## शब्दगंध क्र. ७३७६ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | | ४ | ५ |
| ६ | | ■ | ७ | | ■ | ८ | |
| ९ | | १० | | ■ | ■ | ११ | |
| | ■ | १२ | | | १३ | ■ | |
| १४ | १५ | | | ■ | १६ | १७ | ■ |
| १८ | | ■ | ■ | १९ | | | २० |
| ■ | २१ | २२ | | | ■ | २३ | |
| २४ | | | ■ | २५ | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) खूण; इशारा; ठरविलेले स्थान ३) महादेवाचे मंदिर ६) गेलेला; अवस्था; भूत; दशा ७) एक द्रवरूप धातू ८) पखवाज; अलंकार; संच; वेष; सरंजाम ९) स्त्रियांचा एक दागिना ११) 'इन्शुरन्स'चे मराठी रूप १२) महादेवाचे एक नाव १४) बसण्यासाठीचे एक वस्त्र; आसन १६) हलणारे; विनाशी १८) कवितेत तुझे १९) गायी पाळणे २१) मोठे खटले किंवा कुटुंब २३) त्याअर्थी; नाव किंवा होडी उतरून जाण्याजोगी लहान खाडी २४) मातलेला; मुजोर; उन्मत्त २५) अंगणात वगैरे केले जाणारे शेणाच्या पाण्याचे सिंचन

**उभे शब्द :** १) सोबत बरोबर असणारे माणूस २) ध्वजा; पताका; झेंडा ३) रव्यापासून बनविला जाणारा एक गोड पदार्थ ४) गणितातील 'लघुत्तम साधारण विभाजक'चे संक्षिप्त रूप ५) यज्ञकर्ता; मालक; पती; स्वामी ७) तेजस्वी; सतेज १०) पाणी वाहण्याची कातडी पिशवी; पखाल; मच्छर; डास; पोट १३) बदला; सूड १५) सूट ; डिस्काउंट १७) उत्तररात्री गाण्याचा एक राग १९) गायीचे दूध २०) सोंगटी २२) घोडे जोडलेले एक वाहन

### शब्दगंध क्र. ७३७५ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| र | ग | ■ | क | ■ | पा | रो | सा |
| वा | ण | सा | मा | न | ■ | म | ल |
| ■ | गो | ग | ल | गा | य | ■ | प |
| फ | त | वा | ■ | रा | ज | व | ट |
| र | ■ | न | र | ■ | मा | ज | ■ |
| क | था | ■ | ट | ■ | न | न | ■ |
| ■ | प | स | र | ट | ■ | दा | स |
| आ | ट | पा | ट | न | ग | र | ■ |

### फिल्मीचक्कर क्र. १२२६ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| म | नी | षा | को | ई | रा | ला | ■ |
| द | ■ | ■ | ■ | ■ | ■ | ■ | ल |
| र | ■ | ज | य | ज | य | शि | व |
| इं | डि | या | ■ | यं | ■ | का | ■ |
| डि | ■ | ■ | ख | त | ■ | र | ■ |
| या | रा | ना | ■ | ■ | ■ | ■ | ग |
| ■ | त | ■ | प्रे | म | पु | जा | री |
| तु | का | रा | म | ■ | री | ■ | ब |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : ध्येय कितीही दूर असेना, पण हिंमत हारू नका, कारण डोंगरातून निघालेल्या नदीने कधी कोणाला समुद्राचा रस्ता विचारला नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### छत्रपती शिवाजी महाराजांचा आहार कसा होता?

छत्रपती शिवाजी महाराज हे त्यांच्या शिस्तबद्ध जीवनशैलीसाठी ओळखले जायचे. स्वराज्याच्या उभारणीत व्यस्त असल्याने त्यांचा आहार अतिशय साधा, सात्विक आणि पौष्टिक असे.

**साधे आणि गावरान जेवण :**

महाराजांना विलासी अन्नापेक्षा महाराष्ट्रातील पारंपारिक आणि गावरान जेवण अधिक आवडत असे.

**यामध्ये प्रामुख्याने यांचा समावेश होता :**

**ज्वारी किंवा बाजरीची भाकरी :** ही त्यांच्या आहाराचा मुख्य भाग होती.

**पिठलं-भाकरी :** कष्टाच्या आणि युद्धाच्या काळात हे त्यांचे आवडते जेवण असायचे.

याशिवाय ज्या पालेभाज्या आणि फळभाज्यांचा त्यांच्या आहारात समावेश असे. महाराजांना दुग्धजन्य पदार्थ, विशेषतः दही आणि ताक खूप आवडायचे. स्वराज्यातील मावळ्यांप्रमाणेच तेही ताकाला प्राधान्य देत, जे शरीराला थंडावा आणि ऊर्जा देणारे असे.

महाराजांना फळांची विशेष आवड होती. रायगडावर त्यांनी अनेक फळबागा लावल्या होत्या. कोकणातील हापूस आंबा त्यांना विशेष प्रिय होता. अंजीर आणि केळी यांसारख्या स्थानिक फळांचाही ते आहारात समावेश करत.

छत्रपती शिवाजी महाराज दिवसातून एकदाच दुपारच्या वेळेस भोजन करत असत. इतर वेळेस ते केवळ दूध, फळे आणि सुकामेवा यांचे सेवन करत असत. दाळ खिचडी आणि त्यावर गाईचे तूप हे महाराजांच्या आवडीचे पदार्थ होते. महाराज मिताहारी म्हणजे अगदी प्रमाणबद्ध भोजन करणारे होते.

महाराजांच्या जेवणाची वेळ निश्चित असे. ते कधीही अन्नाचा अपव्यय करत नसत आणि अति जेवण टाळत असत. गनिमी काव्याच्या मोहिमांवर असताना जे मिळेल ते (उदा. चटणी-भाकरी) आनंदाने खाऊन ते स्वराज्याच्या कामात मग्न राहत.

छत्रपती शिवाजी महाराज शाकाहारी असल्याचे अनेक ऐतिहासिक संदर्भातून सूचित होते. त्यांचा रोजचा आहार सात्विक व संतुलित असायचा, ज्यामध्ये ज्वारी, बाजरी, नाचणीची भाकरी, दही, दूध, तूप आणि लोणी यांचा समावेश होता. थोडक्यात सांगायचे तर, साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हे त्यांच्या आहारातूनही दिसून येते.

### अनावश्यक राग


एके दिवशी, एक साप एका गोदामात शिरला. गोदामात अंधार होता. अंधारात, साप कशावर तरी आदळला आणि त्याला थोडी दुखापत झाली. मग, साप रागावला आणि त्याने आपला कणा वर केला. त्याने ज्या वस्तूला आदळला होता त्याला चावण्याचा प्रयत्न केला.

या प्रयत्नात, त्याने स्वतःच्या चेहऱ्याला दुखापत केली, कारण ती वस्तू फक्त एक धारदार करवत होती - जी साप नियंत्रित करू शकत नव्हता. पण रागाने त्याला पकडले आणि त्याने सर्व नियंत्रण गमावले. मग त्याने साप नेहमी करतात तेच केले. तो करवतीला घट्ट चिकटून राहिला आणि दाब देऊन त्याचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला. मग, जे घडायचे होते ते घडले. करवतीच्या तीक्ष्ण धारने त्याचे संपूर्ण शरीर रक्ताने माखले.

दुसऱ्या दिवशी, जेव्हा गोदामाच्या मालकाने गोदामा उघडला तेव्हा त्याला करवतीभोवती गुंडाळलेला एक मृत साप आढळला. रागावर नियंत्रण नसल्यामुळे सापाने आपला जीव गमावला होता.

तात्पर्य : राग आपले स्वतःचे सर्वात जास्त नुकसान करतो.

## जीवन का अमृत (भाग १)



मौत और दूरी, सतुरु-शिष्य के संबंधों में कोई मायने नहीं रखते। वह सदा शिष्य के पास है, इस लोक में भी और परलोक में भी। पवित्र शब्द-धुन सदा आपके साथ है और अगर सही तरीके से आप इसका अभ्यास करेंगे, तो आप, सतुरु की दया से, इसे ज्यादा साफ सुनेंगे। शिष्य कभी-कभी पुराने कर्मों के असर से ध्यान के समय शरीर से ऊपर आने और परलोक में जाने का अनुभव पा सकता है। यह सोते समय भी हो सकता है।

सतुरु की महानता इसमें है कि जब कोई उससे मिलता है, उसको वह परलोक के रहस्यों की दीक्षा देता है और उसको दो जन्मा होने का प्रत्यक्ष अनुभव प्रदान करता है और तब इसका नियमित रूप से अभ्यास करके, नामलेवा स्वेच्छा से परलोक में प्रवेश कर सकता है और शब्द की अकथनीय

### परलोक के मधुर नशे

मधुरता का आनंद उठा सकता है, जिसे जमीन पर किसी कान ने नहीं सुना, किसी आँख ने नहीं देखा। परलोक के मधुर नशे से मोहित हो जाने पर साधक के लिए सभी सांसारिक आनंद और सुख अपना आकर्षण खो देते हैं।

यह मानने लगता है कि वह गुरु बन गया है, अपने आप का ही नुकसान करता है। यह अहंकार है और इससे बचना चाहिए।

समर्थ सतुरु की छत्रछाया में रहना एक बड़ा भारी वरदान है। क्योंकि वह तुम्हें तूफानी संसार सागर से पार ले जा सकता है और आपको सच्चे घर पहुंचा सकता है। मुझे यह जानकर दुख हुआ कि की मृत्यु हो गई है। यह हाड़-मांस का अंत है जब किसी का 'लेन-देन' पूरा हो जाता है, तो उसको जाना पड़ता है। उसका भौतिक शरीर जला दिया गया, पर आत्मा सतुरु की संपत्ति थी और उसकी सँभाल कर ली गई।

धन्य हैं वे लोग, जो प्रेम और श्रद्धा से भजन सिमरन में समय देते हैं और रूहानी तौर से रोजाना तरक्की करते हैं, ताकि वे इस संसार में रहते हुए अंतर में अपने सतुरु के नूरी स्वरूप से मिल सके, जो कि उनका सदा का साथी है और वह उन्हें अपने सच्चे घर पहुँचा देगा।

हर नामलेवा को रास्ता बता दिया गया है और वह एक दिन सचखंड में अपने सच्चे घर पहुंचेगा। जो गंभीरता के साथ कार्य करते हैं और सतुरु के कहे अनुसार जीते हैं, वे तेजी से तरक्की करेंगे, जबकि और लोग अपने लक्ष्य तक पहुंचने में ज्यादा समय लेंगे। घर की यात्रा लंबी है, पर है सुहावनी और जब कोई सच्चे घर पहुँच जाता है तो, हो सकता है, उसे गुरु पद के लिए चुन लिया जाए।

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय : कोणत्याही नात्याचा पाया म्हणजे त्या नात्यातील प्रेम. तुम्ही नेहमी या गोष्टीवर भर दिला की, प्रेम हा आत्म्याचा गुण आहे. तरीही नाती भौतिक असतात. शिवानीदीदी : नात्यांचं मोजमाप कधीच करता येत नाही. आपल्यापैकी अनेकांना नाती सांभाळणं आव्हानात्मक वाटतं म्हणूनच आपण हा विषय चर्चेला घेतला. याआधी नात्यांनी आपल्याला प्रेम दिलंय, आनंद दिलाय आणि जगण्याचा हेतू दिलाय. पण आजकाल ही नाती तणाव, दुःख आणि एकमेकांप्रति मत्सराचा स्रोत बनत आहेत. आपण सगळे एकत्र येऊ या आणि नात्यांमधला मूळ गोडवा परत आणू या. तुम्ही म्हणालात की नाती भौतिक असतात. प्रत्येक नात्यासाठी एक भौतिक ओळख किंवा नाव असतं - जसं, आई-वडील (पालक) आणि मूल, नवरा आणि बायको, इत्यादी. ही ओळख किंवा नाव समोरच्या व्यक्तीच्या आणि आपल्या नात्यावर अवलंबून असतं. पण प्रत्यक्षात नातं म्हणजे काय आणि त्या नात्यामध्ये नक्की काय आहे? नातं म्हणजे

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

दोन आत्म्यांमध्ये असलेला बंध आहे.

सुरेश ओबेरॉय : मला वाटलं, प्रेमळ असणं हा आत्म्याचा गुण आहे (आंतरिक). नातं निर्माण करण्याचा आणखी एक अर्थ आहे, इतरांशी नीट वागणं-बोलणं (बाह्य). या दोन्ही गोष्टी मी वेगळ्या केल्या.

शिवानीदीदी : यामुळेच तर आपली नाती आजच्या घडीला खूप सुंदर नाहीत. एकमेकांशी संवाद साधणं आणि काही कृती करणं एवढ्याच दृष्टिकोनातून आपण नात्यांकडे पाहतो. एखाद्या नात्यात एवढी गुंतवणूक करूनही ते नातं हवं तेवढं सुदृढ नसतं याचं आपल्याला अनेकदा आश्चर्य वाटतं. अशा वेळेस, हे जाणून घ्यायची गरज आहे की आपण समोरच्या व्यक्तीशी फक्त चांगला संवाद साधतोय आणि चांगलं वागतोय की त्या माणसाच्या भल्यासाठी विचारही करतोय ?

सुरेश ओबेरॉय : एखाद्या व्यक्तीबाबत आपल्या मनात आलेला विचार त्या व्यक्तीपर्यंत आधी पोहोचतो, असं तुम्ही म्हणताय का? ते जास्त महत्त्वाचं आहे का? शिवानीदीदी : एक विचार केवळ महत्त्वपूर्ण नसतो तर तोच कोणत्याही नात्याच्या निर्मितीचा एकमेव असा सर्वाधिक महत्त्वाचा पैलू असतो. याचं कारण म्हणजे नातं हे अपरिहार्यपणे दोन आत्म्यांमध्ये होणारी ऊर्जेची देवाणघेवाण आहे. तथापि आजकाल आपण समजतो की नातं म्हणजे फक्त भेटवस्तू, संवाद आणि वर्तणूक यांच्यातील देवाणघेवाण !

सुरेश ओबेरॉय :

परंतु एकमेकांसाठी काहीतरी करणं हा कोणत्याही नात्याचा पाया आहे, असाच विचार करण्याचं प्रशिक्षण आपल्याला दिलं गेलंय.

शिवानीदीदी : इतरांसाठी चांगल्या गोष्टी करणं महत्त्वाचं आहेच पण हे करतानाही आपल्याला आपल्या नातेसंबंधांबाबत झगडायला लागतंय.

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

## हसा आणि शतायुषी व्हा!

लिवर फेल होऊन मेलेल्या दारुड्याला यमराजाने मृत्युलोकात विचारले, 'तुझी शेवटची इच्छा काय आहे ?'

दारुड्या : पुढील जन्मी मला एकच दात दिलास तरी चालेल, पण लिवर मात्र बत्तीस दे...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* कोणत्या भारतीय क्रिकेटरने निवृत्तीची घोषणा केली आहे?

– वृद्धीमान सहा

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

२) आंब्यामध्ये 'अ' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते. त्यामुळे 'अ' जीवनसत्त्वाच्या अभावाने होणाऱ्या रातांधळेपणावर आंबा औषधाप्रमाणे गुणकारी ठरतो. ३) बुबुळांची शुष्कता, डोळ्यांची आग होणे, खाज येणे हे नेत्रदोष, उन्हाळ्यामध्ये नियमित आंबा सेवन केल्याने टाळता येतात.

४) आंब्यामध्ये 'अ' व 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असल्याने तसेच कॅल्शिअम, लोह असल्याकारणाने नियमित आंबा सेवनाने त्वचेचे विकार उदा. जंतूच्या संसर्गामुळे खाज सुटणे, पुरळ येणे, त्वचा काळी पडणे हे विकार टाळता येतात.

५) एखाद्या रुग्णाचे वजन कमी असेल व त्यामुळे त्याची रोगप्रतिकारक शक्ती कमी असेल, तर अशा रुग्णास पिकलेला आंबा व त्यासोबत दूध सकाळ, दुपार, संध्याकाळ असे रोज तीनदा द्यावे. ६) आंबा चोखून खाऊन त्यावर दूध प्यावे.

### आंबा

महिनाभर हा प्रयोग केल्याने रुग्णाची रोगप्रतिकारक शक्ती वाढून वजनही योग्य प्रमाणात होते.

७) जर पाण्यासारखे जुलाब होत असतील, तर आंब्याच्या कोयीचे चूर्ण दीड ते दोन ग्रॅम मधाबरोबर किंवा पाण्यातून घ्यावे. आंब्याची कोय ही कषाय गुणात्मक असल्याने व स्तंभन कार्य करीत असल्याने जुलाब लगेचच थांबतात.

८) स्त्रियांच्या विकारांमध्ये आंब्याच्या कोयीचे चूर्ण खूप उपयुक्त ठरते. अति रक्तस्राव, श्वेतस्राव हे विकार आटोक्यात ठेवता येतात.

९) आंबा आतड्यांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी उपयुक्त ठरतो. आमाशयाच्या रोगांमध्ये आंबा औषध म्हणून कार्य करतो. आंबा खाल्ल्याने मलावष्टंभाचा त्रास होत नाही. पिकलेला आंबा पोट साफ करणारा, चरबी वाढविणारा, शक्तिवर्धक आणि उत्साहवर्धक असतो.

१०) अपचनाच्या तक्रारी, तसेच रक्त कमी असल्याने होणाऱ्या विकारांमध्ये आंबा सेवन करणे लाभदायक ठरते.

११) आंब्याची कोवळी पाने रात्रभर पाण्यात ठेवून सकाळी कुस्करून ते पाणी प्यायले असता मधुमेह हा आजार आटोक्यात ठेवता येतो.

१२) आहारामध्ये कच्च्या कैरीचे लोणचे, मुरांबा कायम वापरावा. फक्त लोणच्यामध्ये कमीत कमी तेल, मीठ व मसाला वापरावा, तर मुरांबा बनविण्यासाठी साखरेऐवजी गुळाचा वापर करावा.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००






अहिल्यानगर सीए शाखा व विद्यार्थी शाखेला WIRC of ICAI कडून लघु श्रेणीतील प्रतिष्ठित 'सर्वोत्तम शाखा' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# अहिल्यानगर सीए शाखा व विद्यार्थी शाखेला WIRC of ICAI कडून लघु श्रेणीतील प्रतिष्ठित 'सर्वोत्तम शाखा' पुरस्कार नुकताच प्रदान

नगर – अहिल्यानगर सीए शाखा व विद्यार्थी शाखेला WIRC of ICAI कडून लघु श्रेणीतील प्रतिष्ठित 'सर्वोत्तम शाखा' पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार ICAI टॉवर, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई येथे आयोजित समारंभात प्रदान करण्यात आला, अशी माहिती शाखेचे अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक व शाखेचे उपाध्यक्ष व विद्यार्थी शाखेचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी दिली.

सन २०२५–२६ या वर्षासाठी हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या पश्चिम विभागामध्ये महाराष्ट्र, गुजरात व गोवा या तीन राज्यांचा समावेश होतो. मागील वर्षभरातील कामगिरीच्या मूल्यमापनाच्या आधारे हा पुरस्कार दिला जातो.

सदर पुरस्काराची घोषणा पश्चिम विभागाचे अध्यक्ष सीए केतन सैया यांनी केली. नगर सीए शाखेने सन २०२५–२६ या वर्षात सीए सभासद तसेच विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबविले. या सर्व उपक्रमांच्या निकषांवर सदर पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

या वेळी शाखेचे अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक म्हणाले की, अहमदनगर सीए शाखा दरवर्षी नवनवीन उपक्रम राबविते. सीए सभासदांसाठी शैक्षणिक कार्यक्रमांबरोबरच विविध चर्चासत्रे, तज्ज्ञांकडून मार्गदर्शन, सेमिनार व कॉन्फरन्स आयोजित केल्या जातात.

वर्षभरात जिल्हाधिकारी पंकज आशिया, जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी, अर्हम विज्ञा प्रणेते परमपूज्य उपाध्याय प्रविणऋषीजी महाराज, कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ESIC) व कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (PF) संघटनेचे संचालक संजीव मिश्रा, तसेच गीता परब यांनी संस्थेला भेट देऊन मार्गदर्शन केले.

क्रेडाई संस्थेबरोबर रेरा व जीएसटी सेमिनार, सहकारी बँका व पतसंस्था यांच्या सभासद व कर्मचाऱ्यांसाठी दोन दिवसीय सहकार प्रशिक्षण, एमएसएमई व स्टार्टअपमधील संधींवर सेमिनार, तसेच आयकर, जीएसटी, अयोध्या RRC, शेअर मार्केट आदी विषयांवरील कार्यक्रम आयोजित करण्यात आले. याशिवाय भारतातील ५० शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन, गुंतवणूकदारांसाठी माहिती अभियान, आर्थिक साक्षरता अभियान, सभासद व विद्यार्थ्यांसाठी क्रिकेट लीग, सांस्कृतिक कार्यक्रम, स्वच्छ भारत अभियान, रक्तदान शिबिर, डेंटल कॅम्प, तसेच गरजू मुलांना शालेय साहित्य वाटप असे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.

या वेळी बोलताना शाखेचे उपाध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया म्हणाले की, वर्षभरात सी ए विद्यार्थ्यां करीता संस्थेने विद्यार्थी राज्य परिषद, AI वर्कशॉप, टाटा मोटर्स व फोर्स मोटर्स या कंपन्यांचा अभ्यास दौरा, तसेच कॉलेज मधील विद्यार्थ्यांसाठी ट्रेन, अर्न लर्न कार्यक्रम, विद्यार्थ्यांसाठी खेळ उत्सव व सांस्कृतिक तसेच इतर कार्यक्रम आयोजित केले.

नगर सीए शाखेच्या सन २०२५–२६ साठीच्या व्यवस्थापकीय समितीमध्ये सीए अभयकुमार कटारिया (उपाध्यक्ष), सीए महेश तिवारी (सचिव), सीए महेश भळगट (खजिनदार), सीए सुनंदा रच्चा (सदस्य) तसेच माजी अध्यक्ष सीए मोहन बरमेचा, सीए संजय देशमुख, सीए अजय मुथ्था, सीए मिलिंद जांगडा, सीए सुशिल जैन, सीए प्रसाद भंडारी, सीए ज्ञानेश कुलकर्णी, सीए (डॉ.) परेश बोरा, सीए किरण भंडारी, सीए संदीप देसरडा, सीए पवनकुमार दरक, सीए ज्ञानेश्वर काळे व सीए सनित मुथा यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

या यशात सर्व कार्यकारी सदस्याचा सहभाग व त्यांच्या कुटुंबियांचा पाठिंबा महत्त्वाचा ठरला असून, त्याबद्दल अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक व शाखेचे उपाध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी आभार व्यक्त केले. नगर सीए शाखेला दरवर्षी सलग पुरस्कार मिळण्याची परंपरा असून, ती याही वर्षी कायम राहिली आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## अंगणातला वासुदेव

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलनः दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

लोकजीवन, लोकाचार, लोकव्यवहार, लोककला, लोकभूमिका यांचे एक अतूट नाते आहे. या अतूट नात्यांच्या स्नेहधाग्याने बांधली जाते ती लोकसंस्कृती. समृद्ध लोककलांचा आणि लोकभूमिकांचा वारसा या महाराष्ट्राला लाभला आणि त्याच्या सहभागाने लोकजीवनात एक आनंदाचे पर्व उभे राहिले. अशाच लोकभूमिकांमध्ये डोळ्यात ठसठशीतपणे भरावी अशी एक लोकभूमिका म्हणजे अंगणातला 'वासुदेव'. खेडेगावातील रम्य पहाट, बाई जात्यावर दळण दळते. दळता दळता जात्यावरची ओवी गाते. ओवीतून तिचे मन मोकळे होते. रानामध्ये बैल घेऊन निघालेला. झाडावर पाखरांचा चिवचिवाट. पाणवठ्यावर तुरळक गर्दी. झंजूमुंजू झालंय. त्याच वेळी हातातला टाळ चिपळ्यांचा नाद घुमवत पदन्यास करीत अंगणात स्वारी उभी राहते ती वासुदेवाची.

डोक्यावर मोरपिसांचा टोप, अंगणात घोळदार अंगरखा, गळ्यात लांबघोळ शेला आणि त्यावर उपरणे. एका काखेत दान घेण्यासाठी झोळी. कपाळावर गोपीचंदनाचा टिळा, हातात टाळ, पायात चाळ आणि एका हातात चिपळ्या तर गळ्यात बासरी अडकविलेली. तो जेव्हा टाळाच्या ठेक्यावर अंगणात गिरकी घेऊन नाचू लागतो तेव्हा त्याच्या झोळीत धान्य टाकलं जातं. त्याला दान दिलं जातं. मग तो म्हणू लागतो....

दान पावलं, दान पावलं,
भिमाशंकरी महादेवाला,
कोल्हापुरात महालक्ष्मीला,
पंढरपुरात विठूरायाला,
आळंदीमंदी ज्ञानदेवाला,
देहूगावात तुकारामाला,
दान पावलं, दान पावलं...

सर्व देवदेवतांची नावे घेत हे दान देवदेवतांना, साधुसंतांना पावलं असं सांगत तो छान पदन्यास करतो. त्याचं हे अंगणातील रूप पाहून प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णच अंगणात उभा आहे असं वाटतं. वासुदेव हे महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचं एक सात्विक आणि प्रासादिक रूप आहे. वासुदेव ही संस्था हजार–बाराशे वर्षांपासूनची प्राचीन आहे. लोकजीवनात वासुदेवाविषयी प्रचंड आकर्षण आहे. जनमानसातील वासुदेवाचे हे स्थान लक्षात घेऊन मराठी संतांनी वासुदेवावर रूपके लिहून आध्यात्मिक प्रबोधनकार म्हणून वासुदेवाला एका उंचीवर नेऊन बसवले. संतांच्या रूपकातील वासुदेव खूपच आगळावेगळा आहे. त्याने अविद्येला घालवून देऊन डोक्यावर श्रीविद्येचा टोप घातलाय. जगात ज्ञानाइतके शुद्ध आणि पवित्र काही नाही. त्या विश्वव्यापी ज्ञानाचा घोळदार अंगरखा त्याने अंगात घातलाय. भारतीय तत्त्वज्ञानात ब्रह्म माया, प्रकृती–पुरुष अशा जोड्या आढळतात. त्यालाच ज्ञानदेवांनी अमृतानुभवात देवो–देवी असं म्हटलंय. त्याने देवोदेवीच्या चिपळ्या हाती घेतल्या आहेत आणि रामनामाचे दान मागत अंगणात उभा आहे.

**– किशोर गांधी**

# पतसंस्थेला दिलेला धनादेश न वटल्याप्रकरणी आरोला १,०५,००० रुपयांचा दंड व कारावास

नगर – लक्ष्मी महिला नागरी सहकारी पतसंस्थेकडुन कर्जदार मोरे प्रकाश तुकाराम यांनी कर्ज घेतले होते. सदरच्या कर्जास आरोपी शेख साजिद रऊफ हे जामीनदार होते. सदर कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी जामीनदार या नात्याने आरोपीने स्विकारली होती. सदरच्या कर्जाच्या थकबाकीपोटी आरोपीने फिर्यादी पतसंस्थेस दिलेला चेक न वटता परत आल्याने फिर्यादीने आरोपी विरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट अॅक्टचे कलम १३८ अन्वये फिर्याद दाखल केली.

सदर फिर्यादीची गुणदोषावर चौकशी होवून आरोपीस धनादेश न वटल्या प्रकरणी चिफ ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट कोर्ट नं.१६ के.एम. सोनवणे यांनी उपलब्ध पुराव्याचा गुणदोषावर विचार करुन व अॅड. प्रतिक्षा मंगलारम यांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन आरोपीस दोषी ठरविले व आरोपीस रु.१,०५,००० दंडाची शिक्षा व सदर रक्कम न भरल्यास १५ दिवस साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली व दंडाची रक्कम फिर्यादीस नुकसान भरपाई देण्याचा हुकुम करण्यात आला. या प्रकरणात फिर्यादी पतसंस्थेतर्फे अॅड. वंदना दहिफळे व अॅड.प्रतिक्षा मंगलारम, अॅड. आप्पासाहेब म्हस्के, अॅड. आर.बी.गाली व संस्थेच्या वतीने सुहास त्रिंबक मोहोरकर यांनी कामकाज केले.

# 'रेडिओ नगर' घोषवाक्य स्पर्धेचा निकाल जाहीर

नगर – जागतिक रेडिओ दिनानिमित्त स्नेहालय संचलित रेडिओ नगर ९०.४ FM तर्फे घेण्यात आलेल्या घोषवाक्य स्पर्धेत प्रथम क्रमांक रामकृष्ण देवराम पाटील यांनी पटकाविला. द्वितीय क्रमांक संगीता अकोलकर यांना, तर तृतीय क्रमांक शंकर पवार यांना मिळाला. उत्तेजनार्थ पारितोषिके सागर चौगुले, ओंकार भोलेनाथ अस्वले, पूजा काकडे यांना मिळाली. या स्पर्धेत शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, तसेच नागरिकांनी सहभाग नोंदवला. पारितोषिक वितरणाचा तपशील लवकरच संबंधितांना कळवला जाईल, अशी माहिती स्टेशन हेड अंशुल सब्बन यांनी दिली.

# सीए शाखेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी अभय कटारिया

नगर – अहिल्यानगर जिल्हा सीए शाखेच्या जिल्हाध्यक्षपदी येथील अभय कटारिया यांची निवड करण्यात आली. याबद्दल सीए अभय कटारिया यांचा रमेश गुंदेचा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी किशोर गांधी, सुभाष भंडारी, किशोर श्रीश्रीमाळ, पारस गुंदेचा, सुरेश मुनोत, विलास गुंदेचा, पवन गुंदेचा आदी उपस्थित होते.



अहिल्यानगर जिल्हा सीए शाखेच्या जिल्हाध्यक्षपदी सीए अभय कटारिया यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा रमेश गुंदेचा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी किशोर गांधी, सुभाष भंडारी, किशोर श्रीश्रीमाळ, पारस गुंदेचा, सुरेश मुनोत, विलास गुंदेचा, पवन गुंदेचा आदी उपस्थित होते.

सत्कारास उत्तर देताना सीए अभय कटारिया म्हणाले की, अहिल्यानगर जिल्हा सीए शाखेच्या माध्यमातून अधिकाधिक चांगले काम करू. आपणावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवून सीए बांधवांना येणाऱ्या अडीअडचणी सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करू, असे सांगितले.

# सायबर सिक्युरिटी व एआय ऑलिम्पियाडमध्ये 'डॉन बॉस्को विद्यालयामधील' विद्यार्थ्यांचे यश



नगर – सायबर सिक्युरिटी आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) ऑलिम्पियाड परीक्षेत डॉन बॉस्को उच्च माध्यमिक विद्यालय, अहिल्यानगर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून विद्यालयाची शैक्षणिक परंपरा उज्ज्वल केली आहे. EduHeal Foundation (EHF) मार्फत घेण्यात आलेल्या सायबर सिक्युरिटी आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) लेव्हल १ परीक्षेत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

या परीक्षेत उच्च माध्यमिक विभागातील महिमा क्षीरसागर, रोहित पाटोळे, सुमेध माघाडे, नंदिनी निकाळजे आणि मर्सी मसीह या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. तसेच आठ विद्यार्थी सायबर सिक्युरिटी आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) लेव्हल २ परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत.

ईएचएफ ही एक नोंदणीकृत आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था असून आघाडीचे शिक्षणतज्ज्ञ, कॉर्पोरेट क्षेत्रातील प्रमुख आणि माध्यम क्षेत्रातील प्रतिनिधी यांच्या माध्यमातून ती कार्यरत आहे. ही संस्था दरवर्षी सुमारे ६००० शाळांपर्यंत आणि ९ लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून प्रतिभावान शालेय विद्यार्थ्यांचा शोध घेण्याचे कार्य करते.


या सर्व विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षिका डॉ. शितल कोतकर व हनी अंदानी यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यालयाचे प्राचार्य फादर अजित मुनिस, संस्थेचे सचिव फादर रिचर्ड डिसिल्वा, व्यवस्थापक फादर मॅवरॉन फर्नांडीस, डॉन बॉस्को इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक रिचर्ड बुरखाव, फादर शेल्डन डायस यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील स्तरावरील परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

# राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त २८ फेब्रुवारीला सावेडी उपनगरात विज्ञान जत्रेचे आयोजन

नगर – राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त सावेडी उपनगरातील रावसाहेब पटवर्धन स्मारक, प्रोफेसर कॉलनीजवळ २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता विज्ञान जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम सिनर्जी सायन्स अॅकॅडमीचे संचालक व शास्त्रज्ञ डॉ. दत्ता पोंदे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येणार आहे.



डॉ. दत्ता पोंदे



सौ. हेमा कोंगे

या विज्ञान जत्रेत शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध वैज्ञानिक उपकरणे व प्रकल्प सादर करणार आहेत. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये कल्पकता व वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित केले जाणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणारा हा अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी उपक्रम ठरणार आहे.

डॉ. दत्ता पोंदे यांनी सांगितले की, यावर्षी विद्यार्थ्यांनी अनेक नाविन्यपूर्ण वैज्ञानिक उपकरणांची निर्मिती केली असून विविध प्रकारचे रोबोट्स, चांद्रयान मॉडेल, स्मार्ट सिटी संकल्पना, जैवतंत्रज्ञान उपकरणे आदी प्रकल्प विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला चालना देणारे आहेत. तसेच या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना बालवैज्ञानिक होण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा व डॉ. सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षा, त्यांची तयारी आणि उपलब्ध संधी याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या विज्ञान जत्रेत खगोलतज्ज्ञ पंकज वैद्य यांनी स्वतः तयार केलेल्या जम्बो दुर्बिणीद्वारे आकाशदर्शनाचे प्रात्यक्षिक सादर करण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित महाराष्ट्र पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ. हेमा कोंगे या विद्यार्थी व पालकांना वैज्ञानिक दृष्टिकोन, भविष्यातील बालवैज्ञानिकांसाठी उपलब्ध संधी तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मुळे बदलत चाललेल्या संशोधन पद्धती याविषयी मार्गदर्शन करणार आहेत.

या विज्ञान जत्रेत जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, रोबोटिक्स, पर्यावरण, स्मार्ट सिटी, अंतरिक्ष आदी विविध विषयांवरील प्रकल्प सादर करण्यात येणार असून सहभागी बालवैज्ञानिकांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात येणार आहे.

पालकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविण्याची नितांत गरज आहे. पालकांनी प्रयोगशीलता व वाचनसंस्कृती जोपासल्यास तो दृष्टिकोन मुलांमध्येही विकसित होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या उपक्रमात सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी ७३८७९००७०० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून नावनोंदणी करावी.



महाराणी ताराबाई कन्या विद्यालयच्या विद्यार्थिनींनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांसाठी घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षामध्ये यश संपादन करत शाळेची मान उंचावली आहे.

# राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षामध्ये महाराणी ताराबाई कन्या विद्यालय, केडगावचे यश

## ३१ विद्यार्थिनी मारली बाजी, गुणवंत मुलींनी उंचावला शाळेचा नावलौकिक

नगर – केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयच्या विद्यार्थिनींनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांसाठी घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा (NMMS) मध्ये यंदा घवघवीत यश संपादन करत शाळेची मान उंचावली आहे.

दरवर्षी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन व शिष्यवृत्ती मिळावी या उद्देशाने ही परीक्षा घेतली जाते. यंदा विद्यालयातील एकूण ३७ विद्यार्थिनींनी परीक्षेत सहभाग घेतला होता. त्यापैकी तब्बल ३१ विद्यार्थिनीना यश मिळालेले असून, हा निकाल अत्यंत अभिमानास्पद मानला जात आहे. यावेळी प्रथम क्रमांकः कुमारी प्रांजल वाघमारे – १४६ गुण, द्वितीय क्रमांकः कुमारी अक्षरा झाडे – १२३ गुण, तृतीय क्रमांकः कुमारी सेजल शिंदे – ११७ गुण

प्रांजल वाघमारे हिने १४६ गुण मिळवत विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. अक्षरा झाडे आणि सेजल शिंदे यांनीही उल्लेखनीय गुण मिळवत विद्यालयाच्या गुणवत्तेची साक्ष दिली आहे.

या यशामागे विद्यार्थिनींची जिद्द, परिश्रम आणि शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. जालिंदर सातपुते, जयश्री कोतकर, मेघा पोपळघट, समृद्धी गरड, नितीन गोफणे, प्रतिभा खळेकर यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

विद्यालयाच्या प्राचार्या वासंती धुमाळ यांनी संपूर्ण उपक्रमावर बारकाईने लक्ष ठेवून विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. नियमित मार्गदर्शन सत्रांमुळे विद्यार्थिनींची तयारी अधिक भक्कम झाली.

यावेळी संस्थेचे सचिव बबनराव कोतकर म्हणाले केडगावच्या शैक्षणिक क्षेत्रात या यशाने नवे पर्व सुरू केले असून, विद्यालयाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. की योग्य मार्गदर्शन, परिश्रम आणि आत्मविश्वास यांच्या बळावर यशाचे शिखर गाठता येते. आर्थिक अडचणी असूनही गुणवत्तेच्या जोरावर मोठे यश मिळवता येते, असे मत त्यांनी व्यक्त केले. व विद्यार्थिनी व शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# 'ऋणानुबंध' चा २८ फेब्रुवारी रोजी 'और इस दिल में' लाईव्ह कॉन्सर्ट

## कार्यक्रमात चांदीची नाणी, पैठण्या व इतर बक्षिसे लकी ड्रॉद्वारे जिंकण्याची संधी




नगर – ऋणानुबंध बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचा 'और इस दिल में' हा लाईव्ह कॉन्सर्ट २८ फेब्रुवारी रोजी माऊली सभागृह, अहिल्यानगर येथे संध्याकाळी ५.३० ते ९ या वेळेत सादर होत आहे.

'और इस दिल में' हा लाईव्ह म्युझिकसह होणारा संगीतमय कार्यक्रम संगीतकार लक्ष्मीकांत प्यारेलाल, कल्याणजी आनंदजी आणि बप्पी लहरी यांच्या गीतांवर आधारित होणार आहे. और इस दिल में, प्यार करनेवाले कभी डरते नही, गोरे रंगपे ना इतना गुमान कर, हम बने तुम बने, सावन का महिना, यार बिना चैन कहा रे अशा अनेक गाण्यांचे सादरीकरण होणार आहे. हिरो, मेहबूब की मेहंदी, जंजीर, धर्मात्मा, एक दुजे के लिये, क्रांती, मिलन या अजरामर हिंदी चित्रपटांतील सुमधुर गीते या कार्यक्रमात सादर केली जाणार आहेत.

अजित रोकडे, डॉ. कंगे, भानुदास महानुर, अजय आदमाने, डॉ. खंडागळे, प्रशांत बंडगर, डॉ. दमन काशीद, चारु ससाणे, सारंग पंधाडे, महेश घावटे, जीवन महाराज, बाबासाहेब जगताप, यशवंत अंबेकर, सारिका रघुवंशी, मोनाली बोरुडे, पूजा गडकरी, सीमा रघुवंशी, दुर्गा हुरे, प्राची लाटे, प्रतिभा साबळे इत्यादी कलाकार गीत सादर करणार आहेत.

या कार्यक्रमात गिटार, सिंथेसायझर, ढोलक, ऑक्टोपॅड, बासरी, सॅक्सोफोन, तबला, ड्रम, काँगो इत्यादी संगीत साधनांचा वापर होणार असून संगीत नियोजन श्रीकांत गडकरी, सत्यजित, दिलावर शेख, अजित गुंदेचा इत्यादी करणार आहेत.

या कार्यक्रमात चांदीची नाणी, पैठण्या व इतर बक्षिसे लकी ड्रॉद्वारे जिंकण्याची संधी प्रेक्षकांना मिळणार आहे. हा कार्यक्रम विनामूल्य असून पासेस ९४२०६३५०९६ / ९८९०८६२१५५ या क्रमांकावर संपर्क साधून उपलब्ध करता येतील. तसेच सभागृहाच्या प्रवेशद्वारावरदेखील पासेस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. अशी माहिती ऋणानुबंधचे सचिन परदेशी यांनी दिली आहे.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. गायत्री कुलकर्णी, विजय मोरे, वंदना कुलकर्णी, डॉ. झेंडे, योगिता कर्डिले व ऋणानुबंध परिवारातील सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत.

# विद्यादान हेच सर्वश्रेष्ठ दान : महापौर सौ.ज्योतीताई गाडे

## लक्ष्मीबाई शांताराम डोके विद्यामंदिर व श्री साई माध्यमिक विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या सत्कार सोहळा

नगर – विद्यादान हेच सर्वश्रेष्ठ दान आहे, असे प्रतिपादन करत महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांनी शिक्षणाच्या पवित्र कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी विद्यार्थ्यांमध्ये नवी ऊर्जा निर्माण झाली.

ज्ञानदीप प्रज्वलित करत, संस्कारांची ज्योत चेतवत आणि गुणवंतांचा गौरव साजरा करत लक्ष्मीबाई शांताराम डोके विद्यामंदिर व श्री साई माध्यमिक विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी महापौर व नगरसेवकांचा सत्कारही करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते नटराज पूजनाने झाली.

यावेळी दीपप्रज्वलन करून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक निखिल वारे, नगरसेविका श्रीमती शारदाताई ढवण, नगरसेविका सौ. रोशनीताई त्र्यंबके, रोहन सानप, भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष बोरुडे सर, स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे अध्यक्षप्रसाद शिंदे, पोलीस अधिकारी सौ. कल्पना अवसर, माजी विद्यार्थी योगेश पिंपळे, अडबंगीनाथ माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य गहिनीनाथ गर्जे, सतीश राजगुरु व बजरंगशाळेचे सहशिक्षक मोरे आदी उपस्थित होते.





ज्ञानदीप प्रज्वलित करत, संस्कारांची ज्योत चेतवत आणि गुणवंतांचा गौरव साजरा करत लक्ष्मीबाई शांताराम डोके विद्यामंदिर व श्री साई माध्यमिक विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी महापौर व नगरसेवकांचा सत्कारही करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब डोके व सचिव आशाताई डोके यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रास्ताविक सोमनाथ शेलार यांनी केले. अध्यक्षीय सूचना मुख्याध्यापक रिबेका क्षेत्रे यांनी मांडल्या. सूत्रसंचालन मंदाकिनी पांडुळे व सुप्रिया वाळके यांनी प्रभावीपणे केले. मुख्याध्यापक पवार सर, जगदाळे सर तसेच शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

मनोगतात बापूसाहेब डोके यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा सातत्याने प्रयत्नशील राहील. त्यांनी उपस्थितांचे आभार मानले. १९९९ साली लावलेले या शाळेचे छोटेसे रोप आज ज्ञानाच्या वटवृक्षात रूपांतरित झाले आहे. गेल्या १८ वर्षांपासून सातत्याने आयोजित होत असलेला हा वार्षिक समारंभ सांस्कृतिक कार्यक्रम, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव गुणवत्तेला प्रेरणा देणारा ठरत आहे.



फिफ्टी वन रेनबो या आईस्क्रीम पार्लरचे महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले.

# फिफ्टी वन रेनबो आईस्क्रीम पार्लरचे उद्घाटन

नगर – सावेडी उपनगरात नव्या आकर्षणाची भर पडली असून फिफ्टी वन रेनबो या आईस्क्रीम पार्लरचे महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी अजिंक्य बोरकर, माजी नगरसेविका शोभाताई बोरकर, नगरसेविका गौरीताई बोरकर, तसेच संचालक राहुल राजेंद्र शहाणे, रोहित राजेंद्र शहाणे, समस्त शहाणे परिवार व मित्र परिवार उपस्थित होते.

पुणे–मुंबईसारख्या शहरांमध्ये लोकप्रिय असलेला हा आईस्क्रीम ब्रँड आता नगरवासीयांसाठी उपलब्ध झाला आहे. पार्लरमध्ये विविध चवींची आईस्क्रीम ग्राहकांना अनुभवता येणार असून विशेषतः केसर पिस्ता, बटरस्कॉच क्रंच, ब्लॅक करंट, राजभोग रोल, बबलगम ब्लास्ट आणि मँगो मॅजिक या फ्लेवर्सना ग्राहकांचा प्रतिसाद मिळत आहे. याशिवाय एअरथ शेक स्पेशल, रॉयल संडे आणि मँगो फालुडा हे खास डिलाइट्स देखील ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

ग्राहकांसाठी विशेष ऑफर जाहीर करण्यात आली असून ताजमहल फालुदा ९९ रुपये, बबन वाफल १४९ रुपये आणि फ्रेश मँगो फालुदा १४९ रुपयांत उपलब्ध आहे. आधुनिक सजावट, स्वच्छता आणि कुटुंबासह आनंद घेता येईल अशी आरामदायी व्यवस्था हे या पार्लरचे वैशिष्ट्य असून उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशी ग्राहकांनी गर्दी करून नव्या चवींचा आस्वाद घेतला. नगरवासीयांनी एकदा कोहिनूर मंगल कार्यालयासमोरील पारिजात चौक येथील फिफ्टी वन रेनबो आईस्क्रीम पार्लरला भेट देऊन या अनुभवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालकांनी केले आहे.

# सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात



नगर – सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल मध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मराठी सप्ताह साजरा करून त्यात मुलांनी 'रंग साहित्याचे' या विषयांतर्गत वेगवेगळ्या साहित्याप्रकारांची माहिती विद्यार्थ्यांनी दिली. त्याच बरोबर २७ फेब्रुवारी या दिवशी कार्यक्रमाची सुरुवात सरस्वतीच्या व कुसुमाग्रज्यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचे महत्त्व सांगणारी भाषणे, कविता व नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमात मराठी भाषेचा इतिहास, समृद्ध परंपरा आणि आधुनिक काळातील महत्त्व यावर मार्गदर्शन शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी उत्कर्ष भोर याने केले, तसेच विद्यार्थ्यांसाठी म्हणी, भाषिक ज्ञान व प्रश्नमंजुषा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. मराठीच्या विभाग प्रमुख सीमा कोटस्थाने यांनी 'अपरिचित कुसुमाग्रज' या विषयावर बोलतांना कुसुमाग्रजांचा जीवनपट उलगडून त्यांच्या कार्याचा आढावा घेतला. सॅजिटेरियस ग्रुपच्या विद्यार्थिनींनी नृत्य सादर केले.त्यासाठी मराठीच्या शिक्षिका सुमन कदम यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्या गीता तांबे यांनी मराठी भाषा जपणे व दैनंदिन जीवनात तिचा अभिमानाने वापर करणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचे सांगितले.

मराठी दिनाचे औचित्य साधून शाळेच्या वतीने मराठी विषय शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

अमोल धोपावकर यांनी आभार प्रदर्शन केले. प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा, संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोदर माखिजा विश्वस्त महेश मध्यान सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी, हरेश मध्यान यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

सौ. वैशाली शिंदे व सर्वांच्या सहभागामुळे कार्यक्रम आनंददायी वातावरणात झाला.



सारोळा बद्दी येथील माउंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलमध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलमध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात

नगर – सारोळा बद्दी येथील माउंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलमध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून एम.आय. डी.सी., अहमदनगर येथील फॉर्कस इम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक राजेश जग्गी उपस्थीत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुणे राजेश जग्गी यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी भाषणे, नाट्यवाचन, कविता व समुहनृत्य याद्वारे मराठी भाषेचा गौरव केला. यावेळी राजेश जग्गी यांनी मुख्याध्यापिका जयश्री खरात यांना फॉर्कस इम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेड च्या सीएसआर निधीमधून आणि रोटरी ई क्लब ऑफ एम्पॉवरींग युथच्या माध्यमातून रोटरी इंटरनॅशनल वॉटर अँड सॅनिटेशन फोकस एरिया अंतर्गत मुलामुलींसाठी शौचालय प्रकल्पासाठी मदतीचा धनादेश प्रदान केला.

याप्रसंगी रोटरी क्लबच्या नंदिनी जग्गी, डॉ. बिंदू शिरसाठ व डॉ. शाम खरात उपस्थित होते. पल्लवी भोसले हिने प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली श्रावणी म्हस्के हिने आभार मानले.

सूत्रसंचालन सृष्टी पोकळे, ऋतुजा म्हस्के व सुकन्या वायकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उज्वला पंडित, सविता पाटोळे, साबा शेख, दिपाली वाघ, प्रिती चंडाले, प्रेरणा बळीद, गायत्री फुलारे, वैष्णवी कांबळे, मुबीना खान, प्रिती कांबळे, अश्विनी घुसाळे व सुमती कला यांनी प्रयत्न केले.

# सारसनगरमध्ये २८ फेब्रुवारीपासून 'आनंद नगरी खरेदी महोत्सव'

नगर – राधेय महिला गृह उद्योग आणि रोटरी प्रियदर्शनी अहिल्यानगर च्या वतीने शी मार्ट या आनंद नगरी खरेदी महोत्सवाचे आयोजन २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी केले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन सकाळी १० वाजता जैन स्थानक, शिवगंगा टॉवर जवळ, सारसनगर येथे होईल. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी याबाबत संकल्पना मांडली आहे. ज्या महिलांना आपल्या हाताने बनवलेल्या आणि त्यांच्यामध्ये सुप्त गुण असलेल्या अशा महिलांच्या कलाकृती व खाद्यपदार्थ या प्रदर्शनामध्ये असणार आहेत. महिलांसाठी अमृतपेठ योजनेचा लाभ मिळणार आहे. तसेच या संदर्भातील मार्गदर्शन आणि माहिती देण्यात येणार आहे. महिलांना थेट बाजारपेठ मिळवून देण्याचे काम या प्रदर्शनातून होणार आहे. यासाठी रोटरी प्रियदर्शनीच्या प्रतिभा धुत यांनी पुढाकार घेतला आहे. तर राधेय उद्योगाच्या उज्वला मालू आणि स्वाती नागोरी यांनी विशेष मेहनत घेतली अशी माहिती प्रमुख मार्गदर्शक गीता गिल्डा यांनी सांगितले.

महिलांनी प्रदर्शनाला भेट द्यावी. जेव्हा आपण ॲमेझॉन वरून खरेदी करतो तेव्हा पैसे हे आपल्या गावात राहत नाहीत तर ते बाहेर जातात पण जर का आपण स्थानिक उद्योजकांकडून खरेदी केले तर पैसे आपल्या गावातच राहतील आणि छोट्या उद्योगांना ताकद व प्राधान्य मिळेल आणि महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होईल. त्यांच्या कष्टाचे चीज होईल.

# मराठी भाषेचे जतन, संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

## जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा



जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया.

नगर – मराठी ही आपल्या संस्कृतीची व अस्मितेची ओळख असून तिचे जतन व संवर्धनाबरोबरच आपल्या मायबोलीचा अधिक प्रचार, प्रसार करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपजिल्हाधिकारी भारती सागरे, तहसीलदार नागेश गायकवाड, उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर, शशिकांत नजान यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होणे ही आपल्यासाठी अत्यंत गौरवाची बाब आहे. ही मान्यता आपल्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेची, ऐतिहासिक वारशाची व वैभवशाली साहित्यसंपदेची पावती आहे. मराठी भाषेच्या जतन, संवर्धन व प्रसारासाठी सर्व स्तरांवर एकत्रितपणे प्रयत्न होणे आवश्यक आहे. शासनाचे मातृभाषेतून शिक्षण देण्याचे धोरण विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रारंभीचे शिक्षण मातृभाषेत झाल्यास विद्यार्थ्यांची आकलनक्षमता, विचारशक्ती व सर्जनशीलता अधिक बळकट होते. त्यामुळे मराठी माध्यम अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

मराठीची समृद्ध साहित्यपरंपरा तरुण पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. वाचनसंस्कृती वृद्धिंगत व्हावी यासाठी विविध उपक्रम, पुस्तक प्रदर्शन, साहित्यिक संवाद व शैक्षणिक कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. मराठी भाषेचा दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वापर करून तिच्या अभिवृद्धीत प्रत्येकाने आपला सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमस्थळी मराठी साहित्याचे पुस्तक प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. साहित्यप्रेमींनी या प्रदर्शनास प्रतिसाद दिला. सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी केले. कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

# साईबाबा मंदिरात महाआरती व महाप्रसाद सोहळा उत्साहात

नगर – अहिल्यानगर शहरातील वसंत टेकडी येथील श्री साई मंदिरात गुरुवारी महाआरती व महाप्रसादाचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात उत्साहात झाला. सर्वांच्या प्रमुख उपस्थितीत साईबाबांची आरती पार पडली. या महिन्याचे अन्नदाते म्हणून त्र्यंबके परिवार यांनी महाप्रसादाची जबाबदारी स्वीकारली होती. महाआरतीचे मानकरी साईभक्त सौ. शकुंतला अंबादास बाबर यांच्या हस्ते आरतीला सुरुवात करण्यात आली.

## महिला व बालकल्याण समिती सदस्य नगरसेविका रोशनी त्र्यंबके यांचा सत्कार



वसंत टेकडी येथील श्री साई मंदिरात गुरुवारी महाआरती व महाप्रसादाचा कार्यक्रम उत्साहात झाला.

यावेळी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समिती सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल नगरसेविका रोशनी त्र्यंबके व भारतीय जनता पार्टीचे स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड झाल्याबद्दल विशाल नाकाडे यांचा वार्ड क्रमांक दोनमधील नागरिकांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

आरती प्रसंगी नगरसेविका रोशनी त्र्यंबके, नगरसेवक विशाल नाकाडे, माजी नगरसेवक सुनील त्र्यंबके, आकाश त्र्यंबके, योगेश पिंपळे, त्र्यंबके परिवार व साई संघर्ष समितीचे सदस्य व पदाधिकारी तसेच वार्ड क्रमांक दोन मधील नागरिक व भाविक उपस्थित होते. संपूर्ण मंदिर परिसर साईरामच्या जयघोषाने दुमदुमून गेला.

यावेळी सुनील त्र्यंबके यांनी सांगितले की, गुरुवार हा साईबाबांचा पवित्र वार असून साईबाबांच्या कृपेनेच सर्व कार्य यशस्वी होत आहे. तसेच आमदार संग्राम जगताप व सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शन व आशीर्वादाने सामाजिक व धार्मिक उपक्रमांना बळ मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

श्री साई मंदिरात दर महिन्याच्या शेवटच्या गुरुवारी महाप्रसादाचा कार्यक्रम नियमितपणे आयोजित करण्यात येतो. मंदिरासाठी तसेच अन्नदानासाठी स्वेच्छेने देणगी द्यावयाची असल्यास इच्छुक भाविकांनी संबंधित साईभक्तांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

यामुळे मंदिर परिसराच्या विकासाला चालना मिळणार असून भाविकांसाठी अधिक सुविधा निर्माण होणार आहेत. कार्यक्रमाच्या शेवटी महाप्रसादाचे वितरण करण्यात आले आणि सर्व भाविकांनी साईनामात तल्लीन होत प्रसादाचा लाभ घेतला.

# जिल्हा ग्रंथालय आयोजित निबंध स्पर्धेत अक्षदा मैड हिने प्रथम क्रमांक पटकावला

## यशराज मैडला प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात येणार





नगर – अहिल्यानगर जिल्हा ग्रंथालय यांच्या माध्यमातून मराठी राजभाषेचा जास्तीत जास्त वापर होण्याबरोबरच मराठी भाषेचे संवर्धन व्हावे. यासाठी जिल्हा निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलची विद्यार्थिनी अक्षदा मैड इयत्ता ८ वि. हिने प्रथम क्रमांक पटकवला. तर यशराज मैड (इयत्ता ७ वि.) या विद्यार्थ्यां ने लिहिलेल्या निबंधाची निवड होऊन २७ फेब्रुवारी रोजी (लोणी, ता. राहता जि. अहिल्यानगर) येथे सम्मनीत करण्यात येणार आहे.

मराठी भाषेचा राजभाषेचा जास्तीत जास्त वापर होण्यासाठी जिल्हा ग्रंथालया अंतर्गत मराठी भाषेचा इतिहास, मी आणि माझे लेखन, करू मात्र भाषेचा सन्मान, महाराष्ट्र घडवू आपला महान, मराठी भाषा आहे सक्षम, संस्कृतीचे रक्षण मराठी आमचा महान, मराठी आमचा स्वाभिमान, यापैकी एका विषयावर ५०० शब्दात स्वस्तक्षरात निबंध लिहून कार्यालयात पाठवण्याचे आवाहन केले होते. यामध्ये भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलची विद्यार्थिनी अक्षदा मैड हिने प्रथम क्रमांक मिळवला. आणि यशराज मैड यानेही निबंध स्पर्धेत भाग घेऊन उत्कृष्ट मांडणी केल्यामुळे त्यांनाही प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हा ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर व रामदास शिंदे यांनी दिली.

# वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगरच्या संचालकपदी आजिनाथ शिरसाठ, सुनिल गुळमकर, दिनेश निकम, बाबासाहेब भांड

नगर – वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्यादीत अहिल्यानगर या संस्थेची व्यवस्थापक समिती सदस्यांची सभा २४ फेब्रुवारी रोजी संस्था कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. अध्यक्षस्थानी अध्यासी अधिकारी के. के. आव्हाड होते. नैमित्तिक रिक्त झालेल्या ४ सर्वसाधारण जागेकरीता अर्ज दाखल करण्याकरीता असणाऱ्या मुदतीत चारच फॉर्म उपलब्ध झाल्याने आजिनाथ शिरसाठ, सुनिल गुळमकर, दिनेश निकम, बाबासाहेब भांड यांची बिनविरोध निवड झाल्याचे के. के. आव्हाड (अध्यासी अधिकारी) यांनी जाहीर केले.

यावेळी स्वाभिमानी तांत्रिक मंडळाचे अध्यक्ष शंकर जारकड, उपाध्यक्ष सुभाष लोखंडे, कार्याध्यक्ष संतोष नेवासकर, कोषाध्यक्ष विक्रम कोके, सचिव प्रशांत ठोंबरे, सदस्य विजय ढवण, नंदकुमार म्हेत्रे, मधुकर पाथरकर, संजय झरेकर, सतिश चोळके, संतोषकुमार कांबळे, गणेश मेहेत्रे व संस्थेचे अध्यक्ष कुशाबा वायसे, व्हा. चेअरमन श्रीमती सुनिता मेढे, सचिव अशोक मते व संचालक सतिश भुजबळ, संतोष शेलार, रुपेश चाकणे, संतोष भिंगारदिवे, चंद्रकांत सुरवसे, अरुण भोसले, प्रविण देशमुख, संचालिका श्रीमती उषा मिसाळ हजर होते.

यावेळी संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक इब्राहीम हवालदार, रघुनाथ लाड इत्यादी उपस्थित होते.

# अहिल्यानगर मनपात वारस हक्क नोकरी प्रमाणपत्र वाटप

## १६ कर्मचाऱ्यांना मिळाली नियुक्तीपत्रे, वारस कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून कामकाजाची गती वाढवावी : महापौर ज्योतीताई गाडे

नगर – महानगरपालिकेच्या आस्थापनावरील अधिकारी आणि कर्मचारी संख्येत होत असलेल्या घटेमुळे प्रशासनास कामाचे नियोजन करणे आव्हानात्मक ठरत आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने कामकाजावर त्याचा परिणाम होताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर, वारस हक्काने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी महापालिकेचे कामकाज शिकून नागरिकांना उत्कृष्ट सेवा द्यावी, असे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

अहिल्यानगर महापालिकेत वारस हक्क नोकरीचे प्रमाणपत्र वाटप सोहळा महापौर ज्योतीताई गाडे व उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते पार पडला.



अहिल्यानगर महापालिकेत वारस हक्क नोकरीचे प्रमाणपत्र वाटप सोहळा महापौर ज्योतीताई गाडे व उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते पार पडला. (छाया – लहू दळवी)

या सोहळ्यात एकूण १६ वारस कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. या प्रसंगी स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर, नगरसेवक महेश लोंढे, रोहन सानप, अनंत लोखंडे, किशोर कानडे, तसेच महानगरपालिका कर्मचारी उपस्थित होते.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या, महापालिकेच्या वाढत्या कामकाजासाठी वारस कर्मचाऱ्यांनी पुढाकार घ्यावा. नागरिकांच्या सुविधा, तक्रारी आणि प्रशासकीय कामकाजात गती यावी यासाठी नवीन कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम केले पाहिजे. उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, महापालिकेतील अनुभवी कर्मचाऱ्यांकडून नवीन कर्मचाऱ्यांनी कामकाज शिकून घ्यावे. जुन्या कर्मचाऱ्यांचा अनुभव हा नवीन कर्मचाऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल. सर्वांनी एकजुटीने नगरकरांना उत्कृष्ट सेवा देण्याचे कर्तव्य पार पाडावे.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## सिंहगर्जनेचा नवा स्वर





वैज्ञानिकांनी सिंहाच्या डरकाळीचा एक नवीन प्रकार शोधला आहे, ज्याला 'इंटरमीडिएट रोर' असे नाव दिले आहे. ही नवी डरकाळी सिंहाच्या प्रसिद्ध, पूर्ण ताकदीच्या डरकाळीपेक्षा लहान आणि कमी स्वराची असते. संशोधकांना आढळून आले आहे की, ही 'इंटरमीडिएट रोर' नेहमी पूर्ण ताकदीच्या डरकाळीनंतरच येते. या शोधावरून असे दिसून येते की, सिंहाचे आवाज पूर्वीच्या कल्पनेपेक्षा अधिक जटिल आहेत, असे यूकेमधील एक्सेटर विद्यापीठातील गणित आणि सांख्यिकीचे डॉक्टरेट विद्यार्थी आणि या अभ्यासाचे प्रमुख लेखक जॉनाथन ग्रोवकोट यांनी सांगितले.

ग्रोवकोट यांनी सांगितले की, 'पूर्ण ताकदीची डरकाळी म्हणजे आवाजाचा एक स्फोट असतो. ती मोठी आणि जटिल असून स्वरात वर-खाली जाणारी असते.' ते पुढे म्हणाले, 'इंटरमीडिएट डरकाळी याहून वेगळी असते. ती कमी स्वराची असून त्यात कमी बदल असतो.' 'इकॉलॉजी अँड इव्होल्युशन' नावाच्या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या या शोधामुळे, सिंहाच्या डरकाळीचा फक्त एकच प्रकार असतो, या जुन्या समजुतीला आव्हान मिळाले आहे. सिंहाची डरकाळी त्यांच्या कळपाशी संवाद साधण्यासाठी आणि त्यांचे क्षेत्र निश्चित करण्यासाठी वापरली जाते. मागील संशोधनातून असे दिसून आले आहे की, सिंहाच्या पूर्ण ताकदीच्या डरकाळ्या या अद्वितीय आणि वैयक्तिकरीत्या ओळखता येण्याजोग्या 'स्वाक्षरी' असतात. त्यातून सिंहाचे लिंग, वय आणि इतर वैशिष्ट्यांची माहिती मिळते.


ग्रोवकोट यांच्या मते, या ध्वनी रेकॉर्डिंगमुळे शास्त्रज्ञांना एका परिसरातील सिंहांची संख्या अधिक अचूकपणे मोजण्यास मदत होईल. या अभ्यासासाठी, संशोधकांनी टांझानियामधील नेरेरे राष्ट्रीय उद्यानात ५० मायक्रोफोन लावले आणि झिम्बाब्वेमधील बुबी व्हॅली कन्सर्व्हेन्सी भागातील पाच सिंहांना कॉलरमध्ये ध्वनिक सेन्सर लावले. एकूण, टीमने आफ्रिकन सिंहाच्या ३,१४९ आवाजांचे रेकॉर्डिंग केले. त्यानंतर या आवाजांचे विश्लेषण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात आला, ज्यातून 'इंटरमीडिएट रोर'चा शोध लागला. ग्रोवकोट म्हणाले की, 'एआय शिवाय सिंहाच्या पूर्ण ताकदीच्या डरकाळ्या आणि त्यांच्या आवाजावर आधारित सिंहांना ओळखणे हे नेहमीच व्यक्तिनिष्ठ राहिले आहे.

' सिंहांना 'गर्जना' व्यतिरिक्त 'ग्रंटस्', 'स्नार्ल्स', 'चफ्स', 'मोन्स' आणि 'म्यूज' असे इतर आवाज देखील असतात; परंतु फक्त पूर्ण ताकदीच्या डरकाळ्यांमध्येच ओळखण्यायोग्य 'स्वाक्षरी' असल्याचे सिद्ध झाले आहे. संशोधकांच्या एआय मॉडिलने सिंहाच्या आवाजाचे वर्गीकरण ९५ टक्क्यांपेक्षा जास्त अचूकतेसह केले. यामुळे मानवी प्रयत्नांमुळे येणारा पूर्वग्रह मोठ्या प्रमाणात दूर झाला. या दृष्टिकोनामुळे वैयक्तिक सिंहांना त्यांच्या पूर्ण ताकदीच्या डरकाळ्यांवरून ओळखणे सोपे झाले आणि पूर्वी अज्ञात असलेली 'इंटरमीडिएट रोर'देखील समोर आली. या नवीन माहितीमुळे भविष्यात संशोधकांना पूर्ण ताकदीच्या डरकाळ्या वेगळ्या करण्यात मदत होईल.

## अंतराळातही जगले शैवाल

शैवाल किंवा शेवाळ या वनस्पतीची बीजे अंतराळातील दीर्घकाळच्या प्रवासातही जिवंत राहिली आहेत, असे वैज्ञानिकांनी उघड केले आहे. ही बीजे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या बाहेर नऊ महिने राहिली आणि पृथ्वीवर परतल्यानंतरही, ८० टक्क्यांहून अधिक बीजे पुनरुत्पादन करण्यास सक्षम होती.

संशोधकांनी 'आयसायन्स' जर्नलमध्ये गुरुवारी (२० नोव्हेंबर) प्रकाशित केलेल्या त्यांच्या निष्कर्षांमध्ये लिहिले आहे की, या शोधातून वनस्पती प्रजाती अत्यंत कठीण परिस्थितीत कशी जगू शकतात, याबद्दलचे आपले ज्ञान वाढते. शेवाळ पृथ्वीवरील काही अत्यंत कठीण वातावरणात, जसे




की हिमालयाच्या थंड शिखरांवर ते डेथ व्हॅलीच्या कोरड्या, भाजलेल्या वाळवंटी वाळूमध्येही तग धरते. शेवाळाची प्रतिकूल परिस्थितीला तोंड देण्याची क्षमता त्याला बाह्य अवकाशातील कठोर वातावरणात जगण्यासाठी एक आदर्श उमेदवार बनवते. बाह्य अवकाशात तापमानातील तीव्र चढ-उतार, बदललेले गुरुत्वाकर्षण आणि उच्च किरणोत्सर्ग यांसारख्या अत्यंत कठीण परिस्थितीचा सामना करावा लागतो.

यापूर्वीच्या प्रयोगांमध्ये, अवकाशात वनस्पती कशा तग धरतात याचा अभ्यास झाला होता; परंतु ते अभ्यास सहसा जीवाणू किंवा पीक वनस्पतींसारख्या मोठ्या जीवांवर केंद्रित होते. आता, संशोधकांनी दाखवून दिले आहे की, Physcomitrium patens' (P. Patens) या शेवाळाचे नमुने अवकाशात केवळ जिवंत राहिले नाहीत, तर त्यांची वाढही झाली. संशोधकांनी प्रथम शेवाळाच्या पुनरुत्पादन चक्रातील विविध टप्प्यांमधील तीन प्रकारच्या पेशींवर चाचणी केली. त्यांना आढळून आले की, बीजाणू असलेले आवरण अतिनील प्रकाश, गोठणे आणि उष्णता यांसारख्या तणावापुढे सर्वाधिक सहनशक्ती दर्शवतात. ल परिस्थितीत काही नमुन्यांचे नुकसान झाले असले तरी, P. Patenr यापूर्वी अशाच परिस्थितीत चाचणी केलेल्या इतर वनस्पती प्रजातींपेक्षा अधिक चांगली तग धरू शकली. फुजिता यांना वाटते की, बीजांभोवती असलेले संरक्षक आवरण अतिनील प्रकाश आणि निर्जलीकरण यापासून संरक्षण करण्यास मदत करते.

## रक्तवाहिन्यांमधील 'झोंबी'चा धोका

एका नवीन अभ्यासात असे आढळून आले आहे की, जसजसे वय वाढते तसतसे रक्तवाहिन्यांमध्ये असलेल्या 'झोंबी झालेल्या' पेशी मधुमेहासारख्या चयापचय विकारांच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. या 'झोंबी पेशींना' नष्ट करणे, भविष्यातील उपचारांसाठी एक प्रभावी मार्ग असू शकते.



सामान्यतः, पेशी जेव्हा तणावामुळे 'जीर्ण' होतात, तेव्हा त्या कायमस्वरूपी विभाजन करणे थांबवतात; परंतु शरीरात टिकून राहतात. या जीर्ण झालेल्या पेशींची काही उपयुक्त कार्ये असू शकतात; उदाहरणार्थ, काही पेशी जखमा बऱ्या करण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतात; परंतु जसजसा वेळ जातो आणि शरीरात या जीर्ण पेशींची संख्या वाढते, तसतसे त्या वय-संबंधित रोगांना कारणीभूत ठरतात. मागील उंदरांवरील संशोधनात, शास्त्रज्ञांनी औषधांनी जीर्ण पेशींना लक्ष्य केल्यास, वृद्धत्वाची विविध चिन्हे कमी होतात आणि प्राण्यांचे निरोगी आयुष्य वाढते, असे लॉस एंजेलिस येथील 'सीडर्स-सिनाई मेडिकल सेंटर'चे सहायक प्राध्यापक आणि या अभ्यासाचे प्रमुख लेखक डॉ. मयासोषी सुडा यांनी सांगितले.'


सेल मेटाबॉलिझम' नावाच्या जर्नलमध्ये गुरुवारी (२० नोव्हेंबर) प्रकाशित झालेल्या या नवीन अभ्यासात, टीमने एंडोथेलियल पेशींवर लक्ष केंद्रित केले. या पेशी रक्तवाहिन्यांच्या आतल्या बाजूला असतात. संशोधकांनी एक विशिष्ट स्थिती ओळखली, ज्यात ही जीर्णता चयापचयासाठी हानिकारक ठरू शकते. या अभ्यासातून केवळ वय-संबंधित चयापचय समस्यांवरच नव्हे, तर वृद्धत्वाच्या अनेक पैलूंवर उपचार करण्याची एक नवीन रणनीती समोर येते, असे या अभ्यासात सामील नसलेल्या हार्वर्ड मेडिकल स्कूलमधील औषधशास्त्राच्या सहायक प्राध्यापिका डॉ. क्रिस्टीना अगुओ-मेंझुकाटो यांनी सांगितले.

डॉ. अगुओ-मेंझुकाटो म्हणाल्या, 'रक्तवाहिन्यांसारखे एक एकत्रित लक्ष्य शोधून, तुम्ही एकाच वेळी वृद्धत्वाच्या अतिशय भिन्न पैलूंना लक्ष्य करण्याची शक्यता उघडता.' जीर्ण पेशींचे योगदान वय-संबंधित चयापचय रोगांच्या विकासात महत्त्वाचे मानले जात आहे; परंतु कोणत्या पेशींमधील जीर्णता हानिकारक आहे आणि कोणती फायदेशीर आहे, हे निश्चित करण्याचा प्रयत्न संशोधक अजूनही करत आहेत. या अभ्यासाचे सह-लेखक आणि सीडर्स-सिनाई मेडिकल सेंटरचे औषधशास्त्राचे प्राध्यापक डॉ. निकोलस मुसी यांनी सांगितले की, या संशोधनात रक्तवाहिन्यांच्या पेशींवर लक्ष केंद्रित करण्यात आले, कारण त्या बहुतेक अवयवांच्या कार्यासाठी महत्त्वाच्या आहेत आणि अनेक ऊतींमध्ये चयापचय नियंत्रित करण्यास मदत करतात.

## आढळला सर्वात दूरचा सुपरमॅसिव्ह ब्लॅकहोल

**जेम्स वेब स्पेस टेलिस्कोपचा वापर करणाऱ्या खगोलशास्त्रज्ञांनी आतापर्यंतचा सर्वात दूरचा सुपरमॅसिव्ह ब्लॅक होल म्हणजेच शक्तिशाली कृष्णविवर शोधल्याची शक्यता आहे. ॠक्न२ नावाच्या आकाशगंगेमध्ये असलेला हा प्रचंड मोठा ऑब्जेक्ट इतका दूर आहे की, खगोलशास्त्रज्ञांना तो बिग बँगनंतर केवळ ३५० दशलक्ष वर्षांनी कसा दिसत होता, तसा दिसत आहे.**

या टीमचे संशोधन अजून 'पीअर-रिव्ह्यू' झालेले नाही. ४ नोव्हेंबर रोजी ते 'प्रीप्रिंट सर्व्हर arXiv' वर अपलोड करण्यात आले. संशोधकांनी 'जेम्स वेब' च्या निअर इन्फ्रारेड स्पेक्ट्रोग्राफ आणि मिड-इन्फ्रारेड इन्स्ट्रुमेंट मधील निरीक्षणांचा वापर केला. या उपकरणांनी दूरच्या आकाशगंगेतून मुळात उत्सर्जित झालेला अल्ट्राव्हायोलेट आणि ऑप्टिकल प्रकाश पकडला, जो विश्वाच्या विस्तारामुळे खेचला जाऊन इन्फ्रारेडमध्ये रूपांतरित झाला आहे.



युनिव्हर्सिटी ऑफ टेक्सास अॅट ऑस्टिनमधील खगोलशास्त्र विभागाचे डॉक्टरेट उमेदवार आणि या अभ्यासाचे प्रमुख लेखक ऑस्कर चावेझ ऑर्टीझ यांनी सांगितले की, GHZ2 हे अशा वेळी अस्तित्वात आहे जेव्हा विश्व अत्यंत तरुण होते. त्यामुळे सुपरमॅसिव्ह ब्लॅक होल आणि त्याच्या यजमान आकाशगंगेला एकत्र वाढण्यास तुलनेने कमी वेळ मिळाला. 'ऑर्टीझ पुढे म्हणाले, 'स्थानिक विश्वात, ब्लॅक होल आणि आकाशगंगा स्पष्टपणे सह-विकसित होतात. परंतु, इतक्या लवकरच्या युगात अशा प्रणालीचा शोध लागल्याने सुपरमॅसिव्ह ब्लॅक होल इतक्या लवकर वस्तुमान कसे मिळवतात, याबद्दल प्रश्न निर्माण होतात.


'इतक्या लवकर या सुपरमॅसिव्ह ब्लॅक होलची निर्मिती कशी झाली, याबद्दल दोन मुख्य परिकल्पना आहेत : ते 'हलके बीज' आहेत जे खूप वेगाने वाढतात. किंवा ते 'जड बीज' आहेत, ज्यांची सुरुवात मोठ्या वस्तुमानाने झाली, ज्यामुळे त्यांना वाढण्यासाठी अधिक सुरुवात मिळाली. GHZ2 चा शोध २०२२ मध्ये लागला होता, तेव्हापासून खगोलशास्त्रज्ञांनी 'जेम्स वेब' चा वापर करून अनेक दूरच्या आकाशगंगा शोधल्या आहेत. तथापि, GHZ2 वेगळे ठरते. कारण, त्याच्या स्पेक्ट्रममध्ये खूप तीव 'उत्सर्जन रेषा' दिसतात. जेव्हा अणू किंवा आयनचे इलेक्ट्रॉन ऊर्जित होतात आणि नंतर विशिष्ट तरंगलांबीवर ऊर्जा सोडतात, तेव्हा हे तेजस्वी प्रकाशाचे पट्टे उत्सर्जित होतात. या रेषा GHZ2 ला ऊर्जा देणाऱ्या प्रक्रियेबद्दल महत्त्वाचे संकेत देतात.

युनिव्हर्सिटी ऑफ मॅसॅच्युसेटस् एमहर्स्टमधील खगोलशास्त्र विभागाचे सहायक प्राध्यापक आणि या अभ्यासाचे सह-लेखक जॉर्ज झावाला यांनी स्पष्ट केले की, 'आम्ही ज्या उत्सर्जन रेषांचे निरीक्षण करत आहोत, त्यांना तयार होण्यासाठी खूप जास्त ऊर्जा लागते आणि त्यांना 'उच्च-आयनीकरण रेषा' म्हणून ओळखले जाते.' झावाला यांनी सांगितले की, वायूच्या आयनीकरण म्हणजेच वायूला उष्णता दिल्यावर अणू इलेक्ट्रॉन गमावून किंवा मिळवून आयनमध्ये रूपांतरित होतात, याबद्दलची सध्याची माहिती प्रामुख्याने जवळच्या स्टार-फॉर्मिंग प्रदेशांवर आधारित आहे आणि ती सहसा तीव उच्च-आयनीकरण रेषांसाठी योग्य नसते. या रेषा, आणि त्यांच्यातील संबंध, सहसा सक्रिय गॅलॅक्टिक न्यूक्लिआय मध्ये आढळतात, ज्यांच्या केंद्रस्थानी सक्रियपणे अन्न सेवन करणारे ब्लॅक होल असतात आणि तिथे खूप जास्त ऊर्जेचे रेडिएशन असते.

## कहाणी अब्जाधिशाच्या लग्नसोहळ्याची!

उदयपूरसारखे राजेशाही सौंदर्य आणि तलावांची शांतता लाभलेले शहर गेल्या काही दिवसांत पुन्हा एकदा जागतिक पातळीवरील शाही विवाह सोहळ्याचे केंद्र बनले होते. जगभरातील अब्जाधीशांना आणि सेलिब्रिटींना आकर्षित करणारे 'रॉयल वेडिंग डेस्टिनेशन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या शहरात भारतीय वंशाचे अमेरिकन अब्जाधीश व्यावसायिक राम राजू मंटेना यांच्या मुलगी नेत्रा मंटेनाचा विवाह सोहळा पार पडला. चार दिवस चाललेल्या या समारंभात नेत्रा मंटेना आणि वंशी गदिराजू यांनी वैवाहिक जीवनाची सुरुवात केली.





अमेरिकेतील जेनरिक औषध उद्योगातील मोठे बादशाह मानले जाणारे राजू मंटेना यांनी जेएनटीयूमधून कॉम्प्युटर सायन्समध्ये पदवी घेतल्यानंतर अमेरिकेत फार्मसीचे शिक्षण पूर्ण केले आणि २००५ मध्ये आपल्या फार्मा उद्योगाची सुरुवात केली. पुढे ते आपल्या कंपनीचे सीईओ आणि चेअरमन बनले आणि कर्करोग तसेच मेंदूविकारांवरील औषधे परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्यात त्यांनी मोठे योगदान दिले. त्यांची एकूण संपत्ती हजारो कोटींमध्ये असल्याचे म्हटले जाते. २०२३ मध्ये त्यांनी फ्लोरिडातील मैनालापॅन येथे सुमारे ४०० कोटी रुपयांचे 'लक्झरी इस्टेट' विकत घेतले होते. सोने दानात देण्याच्या त्यांच्या परंपरेचा भाग म्हणून त्यांनी २०१७ मध्ये तिरुपती बालाजींना २८ किलो सोन्याची 'सहस्त्रनाम माला' अर्पण केली होती.

२१ ते २४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत उदयपूरमध्ये हा शाही विवाह रंगला आणि शहरात बॉलीवूडपासून हॉलीवूडपर्यंतच्या सेलिब्रिटींची दिमाखदार उपस्थिती दिसली. ४० देशांमधून १२६ हून अधिक पाहुणे या समारंभाला आले होते. अमेरिकेच्या राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्या कुटुंबातील ज्युनिअर ट्रम्प हेही या विवाहाला उपस्थित होते. रणवीर सिंग, हृतिक रोशन, माधुरी दीक्षित, शाहिद कपूर, नोरा फतेही, जॅकलिन फर्नांडिज, कृती सेनॉन आणि करण जोहर यांसारख्या बॉलीवूड कलाकारांनी सोहळ्याला आणखी ग्लॅमर दिले. तर हॉलीवूडमधून जेनिफर लोपेज, जस्टिन बीबर, ऑलिव्हर ट्रेव्हेना आणि दया मंटेना यांनी हजेरी लावली.

२२ नोव्हेंबरला झालेल्या संगीत कार्यक्रमात जेनिफर लोपेज आणि जस्टिन बीबर यांनी दिलेला खास परफॉर्मन्स हा या विवाहातील सर्वात चर्चित क्षण ठरला. रोषणाईने उजळून निघालेल्या उदयपूरने चार दिवसांत पुन्हा एकदा आपल्या राजेशाही परंपरेची मोहोर उमटवली. अंदाजे १५० कोटी रुपयांच्या खर्चात पार पडलेल्या या विवाह सोहळ्याने शहराचे सौंदर्य आणि प्रतिष्ठा पुन्हा एकदा जगभर उजळवून टाकली.

## सोन्याच्या रंगामागचे विज्ञान

सोने हे धातूंमध्ये पूर्णपणे वेगळे आणि अनोखे आहे. याच्या पिवळ्या चमकदार रंगामागे एक खास विज्ञान दडलेले आहे. सोने पिवळे दिसण्याचे मुख्य कारण म्हणजे त्याच्या अणूंमध्ये असलेले इलेक्ट्रॉन हे खूप जलद गतीने फिरतात. हे वेगवान इलेक्ट्रॉन निळ्या रंगाच्या प्रकाशाला स्वतःमध्ये शोषून घेतात आणि फक्त पिवळा प्रकाश परावर्तीत करतात, ज्यामुळे आपल्या डोळ्यांना सोने पिवळ्या रंगाचे दिसते.



जगातील धातूंमध्ये सोने हे एकमेव आहे जे तेजस्वी पिवळे दिसते. इतर धातू, जसे की चांदी, तांबे किंवा लोह, एकतर चांदीसारखे पांढरे किंवा लाल-तपकिरी रंगाचे असतात. सोने पिवळे दिसण्यामागे अल्बर्ट आईन्स्टाईनचा सापेक्षतेचा सिद्धांत कारणीभूत आहे. सोन्याचा अणू खूप जड असतो. त्यामुळे, अणुकेंद्राजवळ असलेले इलेक्ट्रॉन जवळजवळ प्रकाशाच्या वेगाजवळ फिरतात. या अत्यंत जलद गतीमुळे, इलेक्ट्रॉन्सचे नेहमीचे वर्तन बदलते. त्यांच्या कक्षा किंचित लहान होतात आणि त्यांची ऊर्जा पातळी बदलते.


या बदलांमुळे, इलेक्ट्रॉन जास्त ऊर्जा असलेल्या (लहान तरंगलांबीच्या) निळ्या रंगाच्या प्रकाशाचे अधिक शोषण करतात. पिवळा आणि लाल रंगाचा प्रकाश शोषला जात नाही, तो आपल्या डोळ्यांपर्यंत परत येतो. यामुळेच सोने आपल्याला तेजस्वी पिवळे दिसते.

जर सापेक्षतेचा सिद्धांत लागू नसता, तर सोनेदेखील चांदीसारखे पांढरे दिसले असते. याच सापेक्षता परिणामामुळे सोन्याला अत्यंत स्थिरता मिळते. सोने हवा, पाणी किंवा अॅसिडमुळे सहजपणे खराब होत नाही. या स्थिरतेमुळेच, प्राचीन काळातील सोन्याचे दागिने आजही चमकत आहेत. सोन्याची दुर्मीळता, सुंदरता आणि ही रासायनिक स्थिरता यांमुळेच ते मौल्यवान मानले जाते. लोक याचा वापर गुंतवणूक, दागिने आणि इलेक्ट्रॉनिक्स अशा अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांत करतात.

**अनेक शतकांपूर्वी, एका भयंकर भूकंपाने पृथ्वीला इतका जोरदार हादरा दिला की, एक संपूर्ण शहर पाण्याखाली अदृश्य झाले. प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो याने या शहराला 'अटलांटिस' असे नाव दिले होते. त्याने वर्णन केले होते की, हे शहर एका बेटावर असलेले अत्यंत सुंदर आणि सुसंस्कृत आहे, जे त्याच्या भव्यता आणि अत्याधुनिकतेत अतुलनीय होते.**

## किर्गिस्तानच्या तलावात अदृश्य शहराच्या स्मृती

अनेक पिढ्यांपासून शास्त्रज्ञ 'अटलांटिस'चा शोध घेत आहेत. आता रशियन पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी दावा केला आहे की, त्यांना किर्गिस्तानमधील 'इशिक-कुल तलावात' एक बुडालेले शहर सापडले आहे. हे शहर त्याच्या काळात समृद्ध, संघटित आणि प्रगत असल्याचे दिसून येते. या शोधाच्या बातमीमुळे अटलांटिसबद्दलच्या जागतिक चर्चा पुन्हा सुरू झाल्या आहेत. रशियन विज्ञान अकादमीच्या संशोधकांनी सांगितले की, १५ व्या शतकात आलेल्या एका विनाशकारी भूकंपानंतर हे शहर इशिक-कुल तलावात बुडाले.



इशिक-कुल तलाव जगातला आठवा सर्वात खोल तलाव आहे. या तलावाचे सर्वेक्षण अजूनही सुरू आहे, तसेच त्याच्या किनाऱ्यांवर उत्खनन केले जात आहे. तलावाखाली सापडलेले हे शहर मोठ्या समृद्धीची चिन्हे दर्शवते. पुरातत्त्वशास्त्रज्ञांना मोठ्या व्यावसायिक क्षेत्रांचे पुरावे मिळाले आहेत. येथील इमारती मजबूत वीट, दगड आणि लाकडी तुळ्या वापरून बांधलेल्या होत्या. धान्य आणि पीठ दळणाऱ्या गिरण्यांचे अवशेषही पाण्याखाली जिवंत राहिले आहेत, जे शहराच्या आर्थिक जीवनाची कल्पना देतात.

रशियन टीमनुसार, हे शहर खूप मोठे होते. एक सार्वजनिक इमारत, जी मशीद, स्नानगृह, मदरसा किंवा सामान्य शाळा असू शकते, ती सापडली आहे. या जागेच्या आत एक मोठी दफनभूमी आढळली आहे, जिथे कबर पारंपरिक इस्लामिक पद्धतींचे अनुसरण करताना दिसतात. मृतदेह उत्तरेकडे तोंड करून आणि चेहरे किब्ला म्हणजे प्रार्थनेच्या दिशेने तोंड करून पुरलेले होते. पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी स्पष्ट केले की, जेव्हा शहर पाण्याने गिळले, तेव्हा बहुतेक रहिवाशांनी आपत्ती येण्यापूर्वीच स्थलांतर केले होते.

नंतर, भटक्या जमातींनी परत येऊन तलावाच्या कडांवर वस्ती केली आणि लहान गावे वसवली. प्लेटोचे 'अटलांटिस' आजही वादाचा विषय आहे. काहीजण याला फक्त दंतकथा मानतात, तर काहीजण ते अस्तित्वात असू शकते, असा युक्तिवाद करतात. इशिक-कुल येथील या शोधामुळे हे स्पष्ट होते की, एकेकाळी इथे एक समृद्ध शहर उभे होते, जे आता पाण्याखाली हरवले आहे. आता तेच प्लेटोने वर्णन केलेले अटलांटिस शहर आहे का हा संशोधनाचा विषय आहे.

# शिक्षण विभागात संचमान्यतेचा 'अंमलबजावणी' गोंधळ; शिक्षकांच्या 'समायोजना'ला न्यायालयामध्ये आव्हान

## बोर्डाच्या परीक्षा सुरू असतानाच 'मिड-सेशन' कारवाईचा घाट; शिक्षक भारती आक्रमक, शिक्षणमंत्र्यांकडे निवेदन

नगर – राज्यातील शिक्षण विभागात सध्या सुरू असलेली संचमान्यता आणि शिक्षक समायोजन प्रक्रिया कायदेशीर कचाट्यात सापडली आहे. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिलेले असतानाही प्रशासन समायोजनाचा रेट्टा लावत असल्याचा आरोप 'शिक्षक भारती' संघटनेनचे पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर यांनी केला आहे. या प्रक्रियेमुळे शिक्षकांचे मानसिक खच्चीकरण होत असून, ही कारवाई त्वरित न थांबवल्यास न्यायालयीन अवमानाचा खटला भरण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.



### न्यायालयीन प्रकरणांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष?

शासनाने ४ फेब्रुवारी २०२६ रोजी पत्राद्वारे शिक्षकांच्या समायोजनाचे निर्देश दिले आहेत. मात्र, १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात (SLP No. २४७९/२०२६) याचिका प्रलंबित असून शासनाला नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच नागपूर खंडपीठाने विविध रिट पिटीशन्समध्ये (उदा. CP ३१८६/२०२५) स्थगिती दिली असताना ही प्रक्रिया राबवणे म्हणजे न्यायालयाचा अवमान असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

### 'आधार'चा तांत्रिक खोडा आणि RTE ची पायमल्ली

संचमान्यतेसाठी 'आधार व्हॅलिडेशन'चे निकष जाचक ठरत आहेत. वर्गात प्रत्यक्ष विद्यार्थी हजर असताना केवळ तांत्रिक कारणास्तव त्यांना 'इन्व्हॅलिड' ठरवून पदे रद्द करणे, हे 'शिक्षण हक्क कायद्याच्या' (RTE) मूळ भावनेच्या विरुद्ध आहे. यामुळे शेकडो शिक्षक 'अतिरिक्त' ठरण्याची भीती निर्माण झाली आहे.

**प्रमुख मागण्यांवर संघटना ठाम :** परीक्षा काळात कारवाई नको: सध्या दहावी-बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा सुरू असल्याने 'मिड-सेशन'मध्ये होणारी समायोजन प्रक्रिया त्वरित थांबवावी.

**क्लस्टर संचमान्यता :** एकाच संस्थेच्या सर्व शाळांमधील पटसंख्या एकत्रित विचारात घेऊन 'क्लस्टर' पद्धतीने पदे निश्चित करावीत, जेणेकरून विस्थापन टळेल.

**ऑनलाइन कामांचे ओझे हटवा :** 'सरल' आणि 'यु-डायस' सारखी ऑनलाइन कामे शिक्षकांकडून काढून घेऊन ती तांत्रिक प्राधिकरणाकडे द्यावीत.

**सेवानिवृत्तांना संरक्षण :** ज्यांची सेवा १ ते ८ वर्षे शिल्लक आहे, त्यांना त्याच पदावर संरक्षण मिळावे.

### थकीत वेतनाची टांगती तलवार

पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील शिक्षकांचे ५११ हेड अंतर्गत गेल्या वर्षाचे वेतन अद्याप थकीत आहे. ३१ मार्च २०२६ पूर्वी हे न्यायालयीन थकीत वेतन न मिळाल्यास आणि दर महिन्याच्या १ तारखेला पगार होण्याची शाश्वती न मिळाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा पवित्रा संघटनेने घेतला आहे. या मागण्यांना राज्य सचिव सुनील गाडगे, विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, उच्च माध्यमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष रामराव काळे, महिला जिल्हाध्यक्षा रूपाली कुरुमकर, जिल्हा उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद, दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, संघटक चंद्रशेखर हासे, सहसचिव राहुल कानवडे, तालुका अध्यक्ष सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, साई थोरात, संपत वाळके, दिगंबर देसाई, रूपालीताई बोरुडे, कल्पना चौधरी, मफीज इनामदार, दीपक फापाळे, गणपत धुमाळ, विजय पांडे, अमोल तळेकर, संतोष नवले, बाबासाहेब तांबे, अकील फकीर, बाबाजी लाळगे, वैभव चोथे, प्रवीण मालुंजकर, श्याम जगताप आदी पदाधिकारी यांनी पाठिंबा दिला आहे

प्रशासनाने कायदेशीर बाबींकडे डोळेझाक करून संचमान्यतेचा घाट घातला आहे. बोर्डाच्या कामात व्यग्र असलेल्या शिक्षकांवर 'अतिरिक्त' ठरण्याची टांगती तलवार ठेवणे अन्यायकारक आहे. सरकारने तात्काळ धोरणात्मक बदल करून परिपत्रक निर्गमित करावे, असे कार्याध्यक्ष शिक्षक भारती पुणे विभागचे प्रा.महेश पाडेकर म्हणाले.

# सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होणारे 'मुख्यमंत्री बाल आशिर्वाद योजना' हे पत्रक बनावट

### जिल्हाधिकारी कार्यालयाकडून स्पष्टीकरण

नगर – सोशल मीडियावर व ग्रामीण भागात मुख्यमंत्री बाल आशिर्वाद योजना या नावाने एक पत्रक मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या पत्रकाद्वारे असा दावा करण्यात येत आहे की, कोरोना काळात किंवा १ मार्च २०२० नंतर ज्या मुलांच्या दोन्ही पालकांचा किंवा एका पालकाचा मृत्यू झाला आहे, अशा १८ वर्षांखालील दोन मुलांना दरमहा ४ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाईल. या कथित पत्रकामुळे ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने नागरिक चौकशीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात व तालुका स्तरावरील शासकीय कार्यालयांमध्ये येत आहेत, ज्यामुळे शासकीय कामकाजात अडथळे निर्माण होत आहेत.

या पत्रकातील माहितीची सत्यता तपासण्यासाठी प्रशासनाने महिला व बाल विकास विभाग आणि समाज कल्याण विभागाकडे चौकशी केली. त्यावर दोन्ही विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, मुख्यमंत्री बाल आशिर्वाद योजना नावाची कोणतीही योजना सध्या राज्यात अस्तित्वात नाही. त्यामुळे सोशल मीडियावर पसरवले जाणारे हे पत्रक पूर्णपणे बनावट, खोटे आणि दिशाभूल करणारे आहे.

### काय म्हटले आहे बनावट पत्रकात ?

या फसव्या पत्रकात असे म्हटले आहे की, ही योजना इयत्ता ५ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आहे. यात ०१ मार्च २०२० नंतर अनाथ झालेल्या मुलांना दरमहा ४,००० रुपये मिळतील, असे नमूद केले आहे. पत्रकात कागदपत्रांची यादी, जसे की रेशन कार्ड, आधार कार्ड, शाळेचे ओळखपत्र व वडिलांचे मृत्यू प्रमाणपत्र, जमा करण्याचे ठिकाण (जिल्हा बाल संरक्षण युनिट/जिल्हा परिविक्षा अधिकारी), आणि संपर्क करण्यासाठी एक मोबाईल नंबर दिला आहे. या सर्व माहितीमुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

### बनावट माहितीवर विश्वास ठेवू नका

प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अशा कोणत्याही फसव्या पत्रकावर किंवा सोशल मीडियावरील माहितीवर विश्वास ठेवू नका. शासकीय योजनांची अधिकृत माहिती मिळवण्यासाठी केवळ विभागांच्या अधिकृत संकेतस्थळांना भेट द्या किंवा संबंधित शासकीय कार्यालयांशी संपर्क साधा. अशा बनावट माहितीद्वारे पैशांची मागणी केली जाण्याची शक्यता असते, त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे आणि कोणत्याही अज्ञात व्यक्तीला आपली वैयक्तिक माहिती किंवा पैसे देऊ नयेत. हे बनावट पत्रक पसरवणाऱ्यांविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# खारघर येथील 'हिंद दी चादर' कार्यक्रमासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून अनुयायांची उपस्थिती

## ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त जय्यत तयारी; प्रशासनाकडून चोख नियोजन

नगर – 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त खारघर, नवीमुंबई येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी आयोजित कार्यक्रमासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून शीख, बंजारा, सिंधी व इतर समाजातील अनुयायी उपस्थित राहणार आहेत. या ऐतिहासिक सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून भाविकांच्या सोयीसाठी चोख नियोजन करण्यात आले आहे.

खारघर, नवी मुंबई येथील ओवे येथे हा मुख्य सोहळा पार पडणार आहे. राज्य शासनाचा अल्पसंख्याक विकास विभाग, राज्यस्तरीय समिती आणि विविध समाज बांधवांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासनाने या सोहळ्याची व्यापक तयारी केली आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी २५ विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून, बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांसाठी निवास, भोजन, आरोग्य व वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यात आली आहे. कोंकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिलेल्या माहितीनुसार, भाविकांसाठी शाळा, महाविद्यालये व मोकळ्या जागांवर निवासाची सोय करण्यात आली असून, वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी विशेष वाहनतळ (पार्किंग) व्यवस्था उभारण्यात आली आहे.

या सोहळ्याचे महत्त्व लक्षात घेऊन, श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या त्याग व बलिदानाचा इतिहास जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरिकांनी व अनुयायांनी या ऐतिहासिक कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासन व शीख समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

# श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागमनिमित्त माउंट लिटेरा झी स्कूल येथे विविध शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम

नगर – 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम निमित्त माउंट लिटेरा झी स्कूल, दौंड रोड, अरणगाव येथे विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. १० ते २७ फेब्रुवारी या कालावधीत हे कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.



श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम निमित्त माउंट लिटेरा झी स्कूल येथे विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या उत्साही प्रभात फेरीने झाली.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या उत्साही प्रभातफेरीने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व सर्जनशील विकासासाठी वाचन स्पर्धा, निबंध स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले.

विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या जीवनावर आधारित माहितीपट दाखवण्यात आला. या माध्यमातून त्यांच्या त्याग, धैर्य आणि मानवतेच्या संदेशाची विद्यार्थ्यांना ओळख करून देण्यात आली.

यावेळी समूहन गायनाचा कार्यक्रमही घेण्यात आला. तसेच श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या जीवनावर आधारित श्री सतिंदर सरताज यांच्या भक्तिगीतांचे समूहन गायन शिक्षक व विद्यार्थ्यांनी भावपूर्णरीत्या सादर केले.

सदर कार्यक्रमास शाळेच्या प्राचार्या शैलजा लोटके यांचे मार्गदर्शन लाभले. सदर उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, संस्कारमूल्ये व इतिहासाबद्दलची जाणीव दृढ झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळा प्रशासनाने शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


## जाहीर नोटीस

क्र.कावि/mag-2/अर्ज/एस.आर./२०५/२०२५
अहिल्यानगर,दि.२४/०२/२०२६

**अर्जदार : सौ.प्रमिला ऑगस्टीन मते,** रा.घर नं.७१६, कलेक्टर ऑफिसजवळ, ता.जि.अहिल्यानगर **विरुध्द :** अधिकारी जन्म मृत्यू नोंदणी विभाग. अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर : **सामनेवाले :** ज्याअर्थी, **सौ.प्रमिला ऑगस्टीन मते यांनी त्यांचे आजोबा नामे कै.नामदेव मारुती मते यांचा मृत्यू दि.१९/०४/१९७८ मृत्यू नोंदीबाबत** यांनी सदरचा अर्ज जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे **कलम १३ (३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार सौ. प्रमिला ऑगस्टीन मते यांनी त्यांचे आजोबा नामे कै.नामदेव मारुती मते यांचा मृत्यू दि.१९/०४/१९७८** रोजी मृत्यू झालेला आहे. त्यांच्या मृत्यूची नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे मृत्यू प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी, **कै. नामदेव मारुती मते यांचा मृत्यू दि.१९/०४/१९७८** रोजी मृत्यू झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा. अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार **सौ. प्रमिला ऑगस्टीन मते यांनी त्यांचे आजोबा नामे कै. नामदेव मारुती मते यांचा मृत्यू दि.१९/०४/१९७८** रोजीच्या **मृत्यूची नोंद** सामनेवाला यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकुम करतील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही. येणेप्रमाणे आज दिनांक २७/०२/२०२६ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझे सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

क्र.कावि/mag-2/अर्ज/एस.आर./२०६/२०२५
अहिल्यानगर,दि.२४/०२/२०२६

**अर्जदार : सौ.प्रमिला ऑगस्टीन मते,** रा.घर नं.७१६, कलेक्टर ऑफिसजवळ, ता.जि.अहिल्यानगर **विरुध्द :** अधिकारी जन्म मृत्यू नोंदणी विभाग. अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर : **सामनेवाले :** ज्याअर्थी, **सौ.प्रमिला ऑगस्टीन मते यांनी त्यांचे चुलते नामे कै.प्रमोद नामदेव मते यांचा मृत्यू दि.१६/०४/१९६१ मृत्यू नोंदीबाबत** यांनी सदरचा अर्ज जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे **कलम १३ (३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार सौ. प्रमिला ऑगस्टीन मते यांनी त्यांचे चुलते नामे कै.प्रमोद नामदेव मते यांचा मृत्यू दि.१६/०४/१९६१** रोजी मृत्यू झालेला आहे. त्यांच्या मृत्यूची नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे मृत्यू प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी, **कै. प्रमोद नामदेव मते यांचा मृत्यू दि.१६/०४/१९६१** रोजी मृत्यू झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा. अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार **सौ. प्रमिला ऑगस्टीन मते यांनी त्यांचे चुलते नामे कै. प्रमोद नामदेव मते यांचा मृत्यू दि.१६/०४/१९६१** रोजीच्या **मृत्यूची नोंद** सामनेवाला यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकुम करतील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही. येणेप्रमाणे आज दिनांक २७/०२/२०२६ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझे सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

क्र.कावि/mag-2/अर्ज/एस.आर./२०७/२०२५
अहिल्यानगर,दि.२४/०२/२०२६

**अर्जदार : सौ.प्रमिला ऑगस्टीन मते,** रा.घर नं.७१६, कलेक्टर ऑफिसजवळ, ता.जि.अहिल्यानगर **विरुध्द :** अधिकारी जन्म मृत्यू नोंदणी विभाग. अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर : **सामनेवाले :** ज्याअर्थी, **सौ.प्रमिला ऑगस्टीन मते यांनी त्यांचे चुलते नामे कै. फ्रॅन्सिस नामदेव मते यांचा मृत्यू दि.२८/०४/१९८५ मृत्यू नोंदीबाबत** यांनी सदरचा अर्ज जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे **कलम १३ (३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार सौ. प्रमिला ऑगस्टीन मते यांनी त्यांचे चुलते नामे कै. फ्रॅन्सिस नामदेव मते यांचा मृत्यू दि.२८/०४/१९८५** रोजी मृत्यू झालेला आहे. त्यांच्या मृत्यूची नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे मृत्यू प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी, **कै. फ्रॅन्सिस नामदेव मते यांचा मृत्यू दि.२८/०४/१९८५** रोजी मृत्यू झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा. अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार **सौ. प्रमिला ऑगस्टीन मते यांनी त्यांचे चुलते नामे कै. फॅन्सिस नाम देव मते यांचा मृत्यू दि.२८/०४/१९८५** रोजीच्या **मृत्यूची नोंद** सामनेवाला यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकुम करतील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही. येणेप्रमाणे आज दिनांक २७/०२/२०२६ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझे सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर

"हर काम देश के नाम"

## अहिल्यानगर छावनी परिषद

एएमएक्स चौक, कैम्प भिंगार, अहिल्यानगर - ४१४००२

Email : ahmedngrcantt@gmail.com Website: ahmednagar.cantt.gov.in

### रसवंती गृहाचा जाहिर लिलाव सूचना

तमाम नागरिकांना कळविण्यात येते की. या जाहिर लिलाव सूचनेद्वारे अहिल्यानगर छावणी परिषद कार्यालयामार्फत उसाचा रस विक्रीसाठी स्टॉलचे पॉइंट ठेक्याने देण्याकरिता मोहरबंद कोटेशन मागविण्यात येत आहेत.

सदर कोटेशन फॉर्म, नियम व अटी तसेच रसवंती गृहाच्या लिलावात सहभागी होण्यासाठी भरावयाची रक्कम, लिलावाची तारीख व ठेक्याचा कालावधी इत्यादी बाबी खालील तक्त्यात नमूद केल्या आहेत. लिलावाच्या सविस्तर अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत कार्यालयात पाहावयास मिळतील, याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | तपशील | ठेक्याचा कालावधी | कोटेशन फॉर्म जमा करण्याचा कालावधी | अनामत रक्कम व फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| ०१ | उसाचा रस विक्रीसाठीचे पॉइंट :<br>१) स्टेट बँकेशेजारी (सर्व्हे नं. ७६)<br>२) पॉटिंजर रोड (नगर-पाथर्डी जंक्शन रोड)<br>३) एम. जी. रोड (भुत बंगल्याशेजारी)<br>४) राम मंदिराजवळ<br>५) शुक्रवार बाजार<br>६) भिंगार एस. टी. स्टँड जवळ (२०३)<br>७) सर्व्हे नं. ७६, पार्किंग एरिया | दिनांक ०१/०४/२०२६ ते ३०/०९/२०२६ | दिनांक २७/०२/२०२६ ते ०९/०३/२०२६ दुपारी ३ वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) | अनामत रक्कम रु. २०००/- फॉर्म फी रु. २२४/- (जी. एस. टी. सह) |

अटी व सूचना : १. लिलाव मंजूर करण्याचा अथवा लिलाव रद्द करण्याचा सर्व अधिकार कार्यालय राखून ठेवत आहे.
२. रसवंती गृहाच्या लिलावात सहभागी झाल्यानंतर एका व्यक्तीस एकच रसवंती गृह घेता येईल.
३. लिलावात निश्चित केलेल्या ठिकाणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणी कोणीही रसवंती गृह लावल्यास त्यांच्याविरुद्ध जप्तीची कारवाई करण्यात येईल.

क्र. अहि. राजस्व/ज्युस स्टॉल/२०२५-२६
छावणी परिषद, अहिल्यानगर
दि. २६/०२/२०२६

मुख्य कार्यकारी अधिकारी
छावणी परिषद, अहिल्यानगर
(पल्लवी विजयवंशी)


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# मुकुंदनगरमध्ये जमिनीच्या वादातून तरुणाला बेदम मारहाण; सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – मुकुंदनगर परिसरात जमिनीच्या वादातून एका तरुणाला बेदम मारहाण केल्याची घटना २६ फेब्रुवारीला सकाळी ८ च्या सुमारास घडली. याप्रकरणी ६ जणांविरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत इम्तियाज उस्मान मिया शेख (वय ३६, रा. दर्गादायरा, मुकुंदनगर) यांनी फिर्याद दिली आहे. २६ फेब्रुवारी रोजी सकाळी आठच्या सुमारास फिर्यादी दर्गा दायरा, मुकुंदनगर येथे असताना आरोपींनी त्यांना गाठले. आरोपींनी फिर्यादीला विचारले की, 'तू आमच्या मालकीच्या जागेबाबत न्यायालयात खटला का भरला आणि आम्हाला कायदेशीर नोटीस का पाठवली?' असा जाब विचारत वाद घातला.

यानंतर आरोपी अजहर इलियास सय्यद, सद्दाम इलियास सय्यद, अल्तमश चाँद सय्यद, खिजर सय्यद, यासर सय्यद आणि इम्रान सय्यद (सर्व रा. दर्गादायरा, मुकुंदनगर) यांनी फिर्यादीला घेरले. आरोपींनी फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी आणि लाकडी दांडक्याने मारहाण केली. त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी पोलिसांनी ६ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.


## जाहीर नोटीस उत्तर

तमांम लोकांस व विशेष करुन रोहन बाजीराव शिंदे यांना या जाहीर नोटीस उत्तराव्दारे कळविण्यात येते की, तुम्ही ता. १६/०२/२०२६ रोजी दै. नवा मराठा या वृत्तपत्रात प्रसिद्धीस दिलेली नोटीस व त्यातील सर्व कथने खोटी व बनावट असून आमचे अशिल यांना मुळीच मान्य व कबुल नाहीत. आमचे अशिल वसंत मनाजी कांबळे यांचे बरोबर रोहन बाजीराव शिंदे यांनी केडगांव येथिल स.नं. ३९२/२ मधील त्यांचे नावावर असलेल्या डिडक्शन एरियाबाबत झालेले साठेखत केलेले होते. सदर साठेखतात तुमचे अशिलाने आमचे अशिलास र.रु. २,५०,०००/- लाखाचा चेक विसारापोटी इंडियन ओव्हरसिज बँक शाखा-अरणगांव ता. जि. अहिल्यानगर चा ता. ०९/१२/२०२५ चा दिलेला होता व सदरील दिलेला चेक वटला नाही तर सदरचा व्यवहार ॲटोमॅटीक रद्द समजण्यात येईल ही सदरील साठेखताची मुख्य अट व शर्त होती. परंतु आमचे अशिलाने सदरील चेक ता. ०९/१२/२०२५ रोजी ते चालवित असलेल्या युनियन बँक ऑफ इंडिया शाखा फरहत हॉटेल शेजारी अहिल्यानगर येथे भरला असता सदरचा चेक फंड्स इन सफिसिएंट असा शेरा मारुन ता. १३/१२/२०२५ रोजी न वटता परत आला आहे. त्यामुळे सदरचा साठेखताचा व्यवहार त्याच दिवशी म्हणजेच ता. १३/१२/२०२५ रोजीच रद्द झालेला आहे. त्यामुळे तुमचे अशिलांना सदरची नोटीस प्रसिद्ध करण्याचा कोणताही हक्क व अधिकार नव्हता व नाही. तुम्ही वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेली नोटीस मागे घेण्यात यावी.

दि.२७/०२/२०२६
अहिल्यानगर

**ॲड. पोपटराव धिवर**
चेंबर नं.१०९, लॉयर्स चेंबर्स,जुने जिल्हा न्यायालय आवार ,अहिल्यानगर, मो.क्रं.८९९९७४७१२१.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेली मिळकत विद्यमान मालक १. फरजाना हादीमीया सय्यद, रा. दर्गादायरा, अहमदनगर, २. तौफीक मुस्ताक सय्यद, रा. अयोध्या कॉलनी, गल्ली नं. २, बेलापूर, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर. ३. आसिफ इलियास सय्यद, रा. जिल्हा परिषद स्कुल जवळ, १८८, मुकुंदनगर, अहमदनगर, ४. अल्तमश चाँद सय्यद, रा. दर्गादायरा, अहमदनगर यांचे मालकीची असून सदर मिळकतीचा व्यवहार आमचे अशिलाबरोबर झालेला असून लवकरच सदर मिळकतीचे खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही **प्रकारे चालू वाद, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, जप्ती, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क, हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ (सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल. याची नोंद घ्यावी. दि. २७/०२/२०२६

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन :-** जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहिल्यानगर (अहमदनगर) महानगरपालिका हद्दीतील मौजे **भिंगार** येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे-

| सर्व्हे नंबर | प्लॉट नं. | चौ.मीटर |
|---|---|---|
| ३२३/२/३२४/१क | ६३ | २०४.०० |

**यापैकी पश्चिमेकडील बाजुचे १०८.०० चौ.मीटर.**
**यांसी चतुःसिमा-**
पुर्वेस - प्लॉट नं. ६३ पैकी, दक्षिणेस - सर्व्हे नं. ३३९,
पश्चिमेस - प्लॉट नं. ६४, उत्तरेस - ६ मीटर सामाईक रस्ता
येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

**ॲड.तनवीर एम.शेख** नोटरी पब्लिक (भारत सरकार)
**ॲड. फैजान फारुक कुरेशी,** कस्तुरी प्लाझा, डावरे गल्ली, अहमदनगर
मो.नं.९२७०४६४६००/७२७६२५२४७८


# दारू प्यायला पैसे न दिल्याने जबर मारहाण

नगर – शहरात दारू प्यायला पैसे न दिल्याच्या कारणावरून एकाला जबर मारहाण करत जिवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची घटना अमरधामच्या मागील गेटजवळ घडली आहे. गणेश रामुल पेंटी (रा. वारुळाचा मारुती तालीम शेजारी) हे या मारहाणीत जखमी झाले असून त्यांच्या फिर्यादी वरून चंदू सोनवणे (रा. वारुळाचा मारुती, नालेगाव) याच्यावर कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी हे अमरधामच्या मागील गेटजवळ असताना आरोपी सोनवणे याने तिथे येऊन त्यांच्याकडे दारूची मागणी केली. पैसे नसल्याने गणेश यांनी दारू पाजण्यास नकार दिला. नकाराचा राग आल्याने आरोपीने गणेश यांना अश्लील शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर आरोपीने गणेश यांना हाताने मारहाण करत जमिनीवर पाडले. आपल्या गुडघ्याने गणेश यांच्या कमरेवर जोरदार प्रहार केले, ज्यात ते गंभीर जखमी झाले आहेत. या मारहाणीनंतर जखमी गणेश यांनी तात्काळ जिल्हा शासकीय रुग्णालयात जाऊन उपचार घेतले. याप्रकरणी फिर्यादी गणेश रामुल पेंटी यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी चंदू सोनवणे याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# तरुणाचा खुन करून अपघाताचा बनाव केल्याचे तपासात निष्पन

## वडगाव तांदळीच्या दोघांवरील दाखल गुन्ह्यात लावले खुनाचे वाढीव कलम

नगर – नगर तालुक्यातील तांदळी वडगाव येथील संदीप ताराचंद लगड (वय ३२) या तरुणाचा झालेला मृत्यू हा अपघात नव्हे तर घातपात असल्याचे स.पो.नि. गणेश वारुळे आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केलेल्या तपासात समोर आले आहे. त्यामुळे आरोपी ऋषिकेश बाळासाहेब धिगे (रा. तांदळी वडगाव) व राजेंद्र रमेश घोंगडे (रा. वडगाव तांदळी) या दोघांवर दाखल असलेल्या सदोष मनुष्य वधाच्या गुन्ह्यात २६ फेब्रुवारी रोजी रात्री खुनाचे वाढीव कलम लावण्यात आले आहे.

मयत संदीप लगड, आरोपी ऋषिकेश धिगे व राजेंद्र घोंगडे हे एकमेकांचे मित्र असून ते १९ जानेवारी रोजी रात्री जेवण करायला वाळकी शिवारात असलेल्या हॉटेल जंगली येथे गेले होते. मयत संदीप हा हॉटेल जंगली येथे जेवण करुन, देऊळगाव सिदधी ते तांदळी वडगाव रोडने, घराकडे येत असताना, पियुष साखर कारखान्यासमोर, डांबरी रोडवर त्याचे पाठीमागुन ऋषिकेश बाळासाहेब धिगे, हा पिंकअप गाडीमध्ये बसुन, राजेंद्र रमेश घोंगडे पिकअप गाडी चालवीत तांदळी गावचे दिशेने भरधाव वेगात येत असताना, यातील मयत संदीप यास सदर पिकअप वाहनाची पाठीमागुन जोराची धडक लागुन अपघात झाला.

सदर अपघातात त्याचे डोक्यात मार लागुन, त्याचे डोक्यातुन, नाकातोंडातुन, रक्तस्त्राव होवुन तो गंभीर जखमी झालेला असताना, त्यास, औषधोपचारासाठी दवाखान्यात नेले नाहीतर त्याचा मत्यु होवु शकतो हे आरोपी यांना माहीती असताना देखील, त्यांनी जाणीवपुर्वक यातील मयत यास दवाखान्यात न नेता आरोपी हे घटना ठिकाणाहुन त्यांचे पिकअप गाडीमधुन अन्य ठिकाणी निघुन गेले. त्यानंतर काहीवेळाने घटना ठिकाणी येवुन फोन करुन, इतरांना बोलावुन घेतले व त्यानंतर मयत यास औषधोपचारासाठी दवाखान्यात दाखल केले असता तो औषधोपचारपुर्वी मयत झाला आहे. तसेच आरोपी यांनी त्यांचेकडुन झालेली घटना लपविण्यासाठी त्यांचेकडील पिकअप वाहनासह इतर ठिकाणी निघुन गेले व त्यांचेकडुन सदरचा अपघात झाला नसल्याचा बनाव करुन, पुरावा नाहीसा केला होता. या प्रकरणी मयताचा भाऊ रामदास ताराचंद लगड (वय ३६, रा. तांदळी वडगाव, ता.नगर) याने २३ जानेवारीला रात्री दिलेल्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलिसांनी दोघांच्या विरुद्ध बीएनएस कलम १०५, २३८, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी दोघांना अटक केलेली असून ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

दरम्यान हा अपघात नसून या दोघांनी केलेला खुन असल्याची तक्रार मयताचा भाऊ याने पोलिस अधिक्षकांकडे करून सखोल चौकशीची मागणी केली होती.

अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी याबाबत स्थानिक गुन्हे शाखेला चौकशीचे आदेश दिले होते. त्यांनी केलेल्या चौकशीत तसेच नव्याने पदभार घेतलेले स.पो.नि. वारुळे यांनी केलेल्या तांत्रिक विश्लेषण यामध्ये या दोघा आरोपींनी मयत संदीप लगड याला जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याला पिकअपची धडक दिली व अपघाताचा बनाव केला असल्याचे निष्पन्न झाले. जेवण करताना त्यांच्या झालेल्या वादाच्या रागातून दोघांनी हा खुन केला असल्याने या गुन्ह्यात दोघांच्या विरुद्ध बीएनएस कलम १०३ (१) असे खुनाचे वाढीव कलम २६ फेब्रुवारी रोजी रात्री लावण्यात आले आहे.

